बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार,दि.१० मे २०२५ | वर्षे४थे | अंक२६५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# पाकचा रडीचा डाव!

**नागरी विमानांचा ढाल म्हणून वापर ▸ भारताने खोलली पाकिस्तानची पोल ▸ भारतातील सीमेलगतच्या शहरांमध्ये गोळीबार ▸ ३६ ठिकाणांवर हल्ल्याचा पाककडून प्रयत्न**

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली: पाकिस्तानची गुरुवारपासून आगळीक सुरू असून भारतातील सीमेलगतच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये गोळीबार सुरू केला आहे. त्याला भारतीय सैन्याने जशास तसे उत्तर दिले. गुरुवारी रात्री पाकिस्तानने ४०० ड्रोनद्वारे भारताच्या जवळपास ३६ ठिकाणांवर हल्ल्याचा प्रयत्न केला. तसेच क्षेपणास्त्रांचाही मारा केला. परंतु भारताने पाकिस्तानचे हे हल्ले निष्प्रभही केले. पण भारतावर हल्ला करणा-या पाकिस्तानने सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळ केल्याचे पुरावे समोर आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे रडीचा डाव खेळत नागरी हवाई क्षेत्र बंद न करता नागरी उड्डाणांचा थेट ढाल म्हणून वापर करणे सुरू आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय उड्डाणांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे.

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांच्या उपस्थितीत सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी आणि व्योमिका सिंग यांनी गुरुवारच्या युद्धभूमीवरील घडामोडींची माहिती देताना पाकिस्तानची पोल खोलली. भारताने प्रतिहल्ला करू नये, म्हणून पाकिस्तानने नागरी विमानांसाठी हवाई हद्द बंद केली नाही. पाकिस्तानचा ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न अयशस्वी ठरलेला असतानाही आपले नागरी हवाई क्षेत्र बंद केलेले नाही. उलट नागरी विमानांचा चक्क ढाल म्हणून वापर करणे सुरू केले.

त्यामुळे पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना नागरी विमानांना आणि नागरिकांना नुकसान होऊ नये, म्हणून भारताने सावध पावले उचलत पाकला प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानने गुरुवारी रात्री भारताची वायू हद्द ओलांडली, त्यावेळी भारताने ४ ड्रोनच्या माध्यमातून प्रतिहल्ला केला. एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रोन हल्ले करून पाकिस्तानला भारताच्या हवाई संरक्षण यंत्रणेची ताकद जाणून घ्यायची होती. पाकिस्तानने हल्ल्यासाठी वापरलेले ड्रोन तुर्कीचे होते. यातील बहुतांश ड्रोन भारताने नष्ट केल्याची माहिती कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली.



### तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांशी मोदींची चर्चा


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिन्ही सैन्याच्या माजी प्रमुखांशी चर्चा केली. राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भात मोदींची सैन्याच्या माजी प्रमुखांशी चर्चा झाली. यावेळी पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी बैठकीत रणनीती ठरली.

### भारतातील २८ विमानतळे बंद

भारताने जम्मू, श्रीनगर, लेह, अमृतसर, चंदिगढ, जोधपूरसह २८ विमानतळ बंद केले आहेत. २८ विमानतळ १५ मेच्या सकाळी ५ वाजून २९ मिनिटांपर्यंत बंद असणार आहेत. त्यामुळे एअर इंडिया, इंडिगो, स्पाईसजेटनं या शहरांमधून होणारी उड्डाणं रद्द केली. देशातील संवेदनशील विमानतळांची आणि त्यांच्या परिसरांची सुरक्षा वाढवण्यात आली.

# दाऊद इब्राहिम पळाला?
## भयभित:कराची शहर सोडून पलायन

पुण्यभूमी प्रतिनिधी



दिल्ली:पाकिस्तान विरोधात ऑपरेशन सिंदूर राबविताना १३ दहशतवादी स्थळांवर मंगळवारी मध्यरात्री जोरदार हल्ला चढविला. या एअर स्ट्राइकची सर्वांनाच जोरदार धडकी बसली आहे. आता अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमची झोप उडाली आहे. त्याचमुळे त्यांनी भयभयीत होऊन संपूर्ण कुटुंबासह कराची शहर सोडून पलायन केल्याचे समजते. पहलगाम येथील हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारी मध्यरात्री भारताने १३ दहशतवादी स्थळांवर मंगळवारी मध्यरात्री जोरदार हल्ला चढविला. या मध्ये मोठया संख्येने दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याचे पुढे आले आहे. त्यानंतर गुरुवारी रात्री पाकिस्तानने भारतातील काही शहरावर ड्रोनने हल्ला करण्याचा प्रयत्न केला मात्र भारताने त्यांची सर्वच ड्रोन हवेतच पाडली. त्यानंतर भारताने हवाई ड्रोन हल्ले केले. त्यामुळे पाकिस्तान चांगलाच बिथरला असल्याचे दिसत आहे.

भारतीय क्षेपणास्त्रांनी लाहोर, सियालकोट आणि कराचीसह पाकिस्तानमधील महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य केले. भारतीय लष्कराने अनेक लष्करी प्रतिष्ठानांवर हल्ला केला. त्यामुळे संपूर्ण पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. भारताने केलेल्या या कारवाईमुळे दाऊद इब्राहिम कराची सोडून पळून गेला आहे. दाऊद इब्राहिमसोबत त्याचे साथीदार अनीस आणि छोटा शकील यांनीही कराची सोडले आहे. त्यासोबतच कुटुंबाला घेऊन दाऊद कराची बाहेर पळाला असल्याची माहिती सूत्राने दिली. दाऊद इब्राहिम आपल्या साथीदारांसह जीव वाचवण्यासाठी एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी गेला आहे. त्याने कराचीतून पळ काढला आहे. त्याला कराचीतून बाहेर काढण्या मागे आयएसआय असल्याचे म्हटले जात आहे. त्याला » पान २ वर

# 'लाइव्ह रिपोर्टिंग'वर बंदी
## निर्णय:भारत-पाकिस्तान सीमेवर वाढता तणाव

पुण्यभूमी प्रतिनिधी



दिल्ली:भारत-पाकिस्तान सीमेवरील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने डिजीटल आणि इलेक्ट्रॉनिक वृत्तवाहिन्यांना लाइव्ह रिपोर्टिंग टाळण्याचा सल्ला दिला आहे. अशा संवेदनशील माहितीचे प्रसारणामुळे 'ऑपरेशनल कारवाईसाठी' धोका निर्माण होऊ शकतो. यापूर्वी कारगिल युद्ध, कंदहार विमान अपहरण आणि २६/११ हल्ल्यावेळी झालेल्या लाइव्ह रिपोर्टिंग(थेट वार्तांकन)मुळे निर्माण झालेले अडथळे लक्षात घेऊन हे आदेश देण्यात आले आहेत.

२६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यावेळी माध्यमांनी सुरुवातीचे दोन दिवसांचे रिपोर्टिंग लाइव्ह केले होते. हेच रिपोर्टिंग बघून दहशतवाद्यांना त्यांचे हॅन्डलर्स फोनवरून पुढील सूचना देत असल्याचे समोर आले होते. सैन्याच्या पुढील कारवाईचा अंदाज यामुळे दहशतवाद्यांना मिळत होता. हाच धोका यावेळी टाळण्यासाठी माध्यमांना लाइव्ह रिपोर्टिंग टाळण्याचा सल्ला केंद्रीय संरक्षण मंत्रालयाने दिला आहे. संवेदनशीलता बाळगण्याचे आणि जबाबदारीने वार्तांकन करण्याचेही आवाहन संरक्षण विभागाने दिले आहे.

जम्मू-कश्मीर मधील पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादांचे ९ तळ उद्धवस्त केले आहेत. त्यानंतर भारत-पाकमधील तणाव वाढला आहे. गुरुवारी दुपारी पाकिस्तानकडून भारताच्या सीमाभागातील » पान २ वर

# तारकेश्वर गड विकासकामे मार्गी
## कार्यक्रम:उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे आश्वासन

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:श्री क्षेत्र तारकेश्वर गड येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित वारकरी भाविकांशी संवाद साधताना, गडाच्या विकासासाठी आवश्यक असलेली सर्व कामे प्राधान्याने पूर्ण केली जातील, असे ठाम आश्वासन दिले.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मी वारकरी संप्रदायाचा सेवक आहे. गडासाठी जे कुंपण, सभागृह, रस्ते आणि इतर विकासकामे आवश्यक असतील ती कामे प्राधान्याने सोडवली जातील. मी दिलेला शब्द पाळतो. त्यांनी वारकरी संप्रदायाच्या अध्यात्मिक परंपरेचे कौतुक करत संत-महंतांच्या योगदानाचे स्मरण केले.

या कार्यक्रमाला आमदार सुरेश धस, महंत आदिनाथ महाराज, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळक, स्वप्निल बंद, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह

# सुशिल सोळंकेला आत्मसमर्पण करण्याचे आदेश
## निर्णय:सर्वोच्च न्यायालयातील जामिन अर्ज काढला

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:येथील पंचायत समितीचे माजी उपसभापती सुशिल विजयकुमार सोळंके याचा जामिन अर्ज सर्वोच्च न्यायालयात दाखल होता.परंतु सर्वोच्च न्यायालयात उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश कायम होत असल्याने आरोपी सुशिल सांळुके यांनी सर्वेच्च न्यायालयात दाखल केलेला जामीन अर्ज परत घेतलेल्या अर्जावर सर्वोच्च न्यायालयाने आरोपी सुशिल साळुंके याने दोन आठवडयाच्या आत आत्मसमर्पन करुन न्यायालयात जामीन अर्ज दाखल करावा असे आदेश केला आहे.त्यामुळे पंचायत समिती माजलगावचे माजी उपसभापती सुशिल विजयकुमार साळुंके याची अटक आता अटळ झाली आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी अशोक बालासाहेब सोळंके याच्या फिर्यादीवरुन सुशिल साळुंके व इतर सहा आरोपीविरुध्द माजलगाव शहर पोलीस ठाणे माजलगाव येथे गुन्हा दाखल झाला होता.आरोपी सुशिल साळुंके याची आई सरपंच असून फिर्यादी व फिर्यादीच्या भावाने ग्रामपंचायत निवडणूकीत » पान २ वर

# पुलाच्या कठड्याला धडकून कार ट्रॅव्हल्सवर आदळली
## बाप-लेक ठार:तीव्र उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने घडला अपघात




पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा : भरधाव कारच्या चालकाचे तीव्र उतारावर नियंत्रण सुटल्याने कार सुरुवातीला पुलाच्या कठड्याला धडकून नंतर समोरुन आलेल्या ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. या अपघातात पिता-पुत्राचा जागीच मृत्यू झाला. पाटोदा शहराजवळ असलेल्या बामदळवाडा येथे गुरुवारी मध्यरात्री हा अपघात घडला.

अल्ताफ अशपाक शेख (४२), अलमस अल्ताफ शेख (१५, दोघे रा. पुणे) अशी मृतांची नावे आहेत. ते केज येथे काही कामानिमित्त आले होते. त्यांची कार वेगात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट पुलाच्या कठड्याला जाऊन धडकली. त्यानंतर दोन ते तीन वेळा पलटी होऊन कार ट्रॅव्हल्स » पान २ वर

**डॉ.गणेश ढवळे | पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार**

# कलेक्टरांचा बिनकामाचा जनता दरबार

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे वैतागलेले शेतकरी पवनचक्की कंपन्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूक आणि पोलिस प्रशासनाची दडपशाही या विरोधात न्याय मागण्यासाठी दि.८ गुरूवार रोजी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील जनता दरबारात न्यायाच्या प्रतिक्षेत असताना जिल्ह्याच्या सर्वोच्च पदावर बसलेल्या जिल्हाधिकारी यांनी त्यांना न्याय देण्यास असमर्थता दर्शवली व पाटोदा उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे दाद मागा मी यात काहीही हस्तक्षेप करू शकत नाही अशी हतबलता दर्शविल्याने अखेर शेतकऱ्यांनी आपली नाराजी दर्शवली व हा तर जिल्हाधिका-यांचा बिनकामाचा जनता दरबार अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

जिल्हाधिकारी बीड यांनी आठवड्यातून ३ दिवस सोमवार, मंगळवार आणि गुरुवार सकाळी ११ ते २ या वेळेत जनता दरबार घेऊन सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकल्या जातील व त्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात येईल असा बीडकरांना विश्वास दिला.याविषयी भरपूर दैनिकातुन प्रसिद्धीही झाली. त्यामुळे वारंवार तक्रारी करूनही समस्या न सुटलेल्या नागरीकांना जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून आपले गा-हाणे मांडुन आपले प्रश्न सुटणार अशा आशा पल्लवित झाल्या होत्या मात्र त्या फोल ठरल्याची प्रतिक्रिया पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील शेतकऱ्यांनी दिली आहे.

जनता दरबारात नागरीकांच्या तक्रारी अनुषंगाने संबंधित विषयांच्या अधिकाऱ्यांना (फोनवर )बोलुन विषय मार्गी लावण्याचे आदेश दिले जातील आणि जिल्हाधिकारी यांनी आदेश दिल्याने आपल्या समस्या मार्गी लागतील अशी भावना असते.त्यामुळे तक्रारदार नागरीकांचे निदान समाधान तरी होते. दि.०७ मे बुधवार रोजी सकाळी पाटोदा तालुक्यातील पाचेगाव येथील » पान २ वर

# पवार,मुंडेंचे हवाई उड्डाण रद्द
## सतर्क:संशयास्पद ड्रोन आढळून आल्याने निर्णय



पुण्यभूमी प्रतिनिधी

नाशिक:देशाची आर्थिक राजधानी व महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथील साकीनाका परिसरात एक संशयास्पद ड्रोन दिसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर काही ठिकाणी हेलिकॉप्टरने उड्डाणे रद्द करण्यात आली आहे. यात उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या देखील हेलिकॉप्टरचे उड्डाण रद्द करण्यात आले आहे.

पंकजा मुंडे यांच्या हेलिकॉप्टर उड्डाणाला परवानगी देण्यात आली नाही. त्यामुळे पंकजा मुंडे यांचा नाशिक दौरा रद्द करण्यात आला आहे. पंकजा मुंडे या शिरूर येथून हेलिकॉप्टरने » पान २ वर

## मान्सूनची खुश खबर!

राज्यात उन्हाळ्याचा कडाका अस झाला आहे. काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे तापमानाचा पारा खाली आल्याने नागरिकांना थोडासा का होईना दिलासा मिळाला. दरम्यान अंदमान–निकोबार बेटांवरून मान्सूनबाबत खुश खबर आली आहे. यंदा वेळेआधीच मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने यंदा १०५ टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला असून केरळमध्ये १ जूनला तर मुंबईसह महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर ८ जूनपर्यंत मान्सून धडकण्याची शक्यता आहे. एल निनोचा प्रभाव नसल्याने अनुकूल वातावरणामुळे पावसाचे प्रमाण चांगले राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटे आणि अग्नेय बंगालच्या उपसागरात मे महिन्याच्या तिस–या आठवडाअखेर मान्सूनपूर्व वातावरण तयार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कमी दाबाचा पट्टा लवकर तयार होईल, त्यामुळे मान्सूनच्या प्रगतीला वेग येऊ शकतो. यंदा महाराष्ट्रात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. तर मध्य महाराष्ट्रात सामान्य पाऊस होईल असा अंदाज आहे. उत्तर गोलार्धात यंदा कमी हिमवृष्टी झाल्याने मान्सूनला पोषक वातावरण आहे. मुंबईत मान्सूनचा पाऊस साधारणपणे जूनच्या दुस–या आठवड्यात सुरू होतो.

यंदा हवामान विभागाने ७ ते ८ जून दरम्यान मुंबईत मान्सूनच्या पावसाला सुरुवात होण्याची शक्यता वर्तवली आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही जास्त पावसामुळे खरीप पिकांना फायदा होईल तसेच धरणे आणि जलाशयांची पाणी साठवणूक वाढेल असा अंदाज आहे. राज्याच्या काही भागात सध्या अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. सोमवारी बीड जिल्ह्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले. दुपारनंतर जिल्ह्यातील बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी आणि केज तालुक्यांत वादळी वा–यासह जोरदार पाऊस झाला. अनेक ठिकाणी गारपीट झाली. परिणामी काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले. हिंगोली जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात वादळी वारे, अवकाळी पाऊस यासह काही ठिकाणी गारपीट झाली. याचा फटका मोठ्या प्रमाणात केळीच्या बागांना बसला. राज्यात पुढील चार–पाच दिवसांत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. वादळ आणि अवकाळी पावसामुळे ब–याच ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. आंबा, मोसंबी, डाळिंब या फळबागांसह इतर पिकांना अवकाळी पावसासह गारपिटीचा फटका बसला. शेतशिवारामध्ये तीळ, ज्वारी, भुईमूग, भाजीपाला फुलशेती आहे. यातील तीळ, ज्वारी आणि भुईमूग ही पिके काढणीच्या अवस्थेत आहेत.

अवकाळी पावसाने या पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यातील काही ठिकाणी कमाल तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअस पार गेला आहे. विदर्भात ४२ ते ४४ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले आहे. राज्यातील तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. उष्णतेच्या झळांनी विविध जिल्ह्यांत नागरिक अक्षरश: हैराण झाले आहेत. घराबाहेर पडताना धडकी भरेल एवढे तापमान राज्यभरात नोंदवले जात आहे. त्यामुळे जनजीवनावर परिणाम झाला आहे. वाढत्या औद्योगीकरणामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. यातूनच कडाक्याची थंडी, प्रचंड उष्णता वाढताना दिसून येते. गत दोन दशकांच्या तुलनेत यंदा ५ ते ७ अंश सेल्सिअसने तापमान वाढल्याचे दिसून येते. याचा सजीव सृष्टीवर विपरीत परिणाम होत आहे. पर्यावरणाचे संरक्षण व्हावे यासाठी आता प्रत्येकानेच वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करण्याची वेळ आली आहे. असे केले तरच वाढत्या तापमानाला आळा बसू शकेल आणि सजीव सृष्टीही वाचविणे शक्य होईल.

अमेरिका, चीनसारख्या प्रगत देशांनी औद्योगीकरणात प्रचंड आघाडी मारली आहे. औद्योगीकरणामुळे पर्यावरणाची हानी करणारे कार्बन डाय ऑक्साईडसारखे विषारी वायू वातावरणात सोडले जातात. त्यामुळे पर्यावरणाची प्रचंड हानी झाली आहे. ओझोन वायू नाहीसा होण्याच्या मार्गावर आहे. ओझोन वायूचा थर विरळ होत असल्याने तापमानवाढीचे संकट गडद होत चालले आहे. दरवर्षी दोन ते तीन अंश सेल्सिअस तापमानात वाढ होत चालली आहे. भविष्यात असेच होत राहिले तर पृथ्वीवरील सजीवसृष्टीचा विनाश होणे अटळ आहे. म्हणून 'झाडे लावा, झाडे जगवा'ची अत्यंत गरज आहे. यंदा फेब्रुवारीपासूनच राज्यात कडक उन्हाळा सुरू झाला. थंडी कमी आणि ऊन जास्त असे वातावरण होते. त्यामुळे सुमारे शंभर वर्षांतील सर्वांत उष्ण फेब्रुवारी महिना ठरला. त्यानंतर मार्च आणि एप्रिल महिन्यांनी त्याचीच री ओढली. म्हणून गत अनेक वर्षांतील यंदाचा एप्रिल उष्ण ठरला आहे. मार्चमध्ये कमाल तापमानाचा पारा ४० अंशावर गेला तसेच सरासरी पाऊस कमीच झाला.एप्रिल महिन्याची सुरुवातही कडक उष्ण झळांनी झाली. म्हणून यंदाचा एप्रिलही खूपच उष्ण ठरतो आहे. हे वातावरण मान्सूनच्या तयारीसाठी अत्यंत अनुकूल आणि पोषक असे आहे. यंदा खूप कडक उन्हाळा आहे. त्यामुळे बाष्पीभवनाचा वेगही जास्त आहे. ढगांची निर्मिती वेगाने होते आहे. म्हणजेच मान्सून आपल्या तयारीला लागला आहे असे दिसते. बाष्प मोठ्या प्रमाणावर तयार होत असल्याने काही ठिकाणी मान्सूनपूर्व पाऊस पडण्यास सुरुवात झाली आहे. मान्सूनच्या हालचाली समुद्रातील पाण्याचे तापमान, वा–याची दिशा, हवेचा दाब यावर अवलंबून असतात. सध्या अरबी समुद्रातील तापमान ३१ तर हिंदी महासागराचे तापमान ३० अंश सेल्सिअस इतके आहे. पाणी खूप तापल्याने वेगाने बाष्पीभवन होत आहे. देशातील हवेचा दाब कमी झाला की समुद्राकडून देशाच्या दिशेने वारे वाहू लागतात. अंदमानात त्याची झलक दिसू लागली आहे. तेथे मान्सूनच्या हालचाली लवकर होत असल्याचे जाणवते आहे. त्यामुळे यंदाचा मान्सून वेळेआधीच केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे.

# गुजरातमधील जिल्हे हाय अलर्टवर

## तणाव:पाकिस्तानचा ड्रोनचा हल्ल्याचा प्रयत्न

पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्ली:८ मे रोजी सलग दुस–या दिवशी गुजरातच्या कच्छ जिल्ह्यात पाकिस्तानने ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न केला. कच्छ सीमेवर ड्रोन हल्ल्याचा प्रयत्न करताना तीन ड्रोन पाडण्यात आले. गुजरातच्या सीमावर्ती भागात पाकिस्तानकडून हल्ला होण्याची शक्यता असल्याने राज्यातील १८ जिल्ह्यांना हाय अलर्ट देण्यात आले असून भूज विमानतळ लष्कराने ताब्यात घेतले आहे.

दरम्यान १८ जिल्ह्यांत अहमदाबाद, अमरेली, बनासकांठा, भरूच, भावनगर, डांग, जामनगर, जुनागढ, खेडा, कच्छ, मेहसाणा, पंचमहाल, राजकोट, साबरकांठा, सुरत, सुरेंद्रनगर आणि वडोदरा ही आहेत. बनासकांठा, कच्छ आणि पाटणच्या सीमावर्ती भागातील गावांमध्ये गुरुवारी रात्री ब्लॅकआउट करण्यात आले. मात्र, सकाळी वीजपुरवठा सुरू करण्यात आला.

चौकट

मुख्यमंत्र्यांनी बोलावली आपत्कालीन बैठक

मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या नेतृत्वाखाली गांधीनगर येथील आपत्कालीन ऑपरेशन सेंटरमध्ये एक बैठक झाली. मुख्यमंत्र्यांनी विविध विभागांचे वरिष्ठ सचिव आणि संबंधित जिल्ह्यांचे प्रशासकीय प्रमुख, पोलिस अधिकारी इत्यादींसोबत आढावा बैठक घेतली. सुरक्षेचा विचार करून, गुजरातच्या सीमावर्ती गावांमध्ये कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. यासह, भूज विमानतळ लष्कराकडे सोपवण्यात आले आहे. राज्यातील आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता, राज्यातील सर्व आरोग्य कर्मचा–यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

**सोमनाथ मंदिराची सुरक्षा वाढविली :** राज्यातील ज्योतिर्लिंग सोमनाथ, शक्तीपीठ अंबाजी आणि द्वारका मंदिर यासारख्या धार्मिक स्थळांवर सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. सोमनाथ मंदिराला आधीच झेड प्लस सुरक्षा आहे. याअंतर्गत येथे त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था आहे. यासोबतच येथे बॉम्ब आणि श्वान पथके देखील तैनात आहेत.

**मच्छिमारांना ताकीद :** ५०० हून अधिक



मच्छिमारांना परत बोलावण्यात आले कच्छमधील भारत–पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवर तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाल्यामुळे मच्छिमारांना परत बोलावण्यात आले आहे. कच्छच्या सीमावर्ती भागातील नारायण सरोवर, जखौ आणि लखपत या सागरी क्षेत्रातील मच्छिमारांच्या सर्व हालचालींवर पुढील आदेश येईपर्यंत तात्काळ बंदी घालण्यात आली आहे.

**सैन्य तैनात :** द्वारका समुद्रकिना–यावर आघाडीवर सैन्य तैनात भारतासोबत झालेल्या प्रत्येक युद्धात पाकिस्तानने द्वारकेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच द्वारका मंदिराच्या संपूर्ण समुद्री परिसरात सैन्य दल तैनात करण्यात आले आहे. द्वारका आणि ओखा समुद्रकिना–यांवरही सुरक्षा यंत्रणांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे. सागरी पोलिसांनीही या समुद्रकिना–यांवर गस्त घालण्यास सुरुवात केली आहे.

हेलिकॉप्टरसह जहाजे तैनात : हजिराच्या किनारी भागातही सुरक्षा वाढवण्यात आली हजिरा बंदराच्या किनारपट्टीवर सुरक्षा यंत्रणाही तैनात करण्यात आल्या आहेत. येथेही नौदल कर्मचारी जहाजे आणि हेलिकॉप्टरसह तैनात आहेत. याशिवाय, समुद्राच्या १२ मैलांच्या परिघात तटरक्षक दल तैनात करण्यात आले आहे.

## पान एक वरून

**दाऊद इब्राहिम पळाला?**

पाकिस्तानमध्येच दुस–या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आल्याची माहितीही सुत्रांकडून मिळत आहे. दाऊदचा संपूर्ण परिवार या हल्ल्यामुळे घाबरला आहे. त्यात पत्नी महजबीन, मुलगा मोईन, त्याचा छोटा भाऊ अनिस इब्राहीम, दाऊदचा डावा हात छोटा शकील यांच्यासह त्याने कराची सोडली असल्याचे समजते

**'लाइव्ह रिपोर्टिंग'वर**

१५ गावांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारताने हा प्रयत्न हाणून पाडला. त्यानंतर भारताने पाकिस्तानच्या हल्लयांना जोरदार प्रत्युत्तर दिले. भारताने पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टिम उद्धवस्त केली.त्यानंतरही भारतीय लष्करी तळावर हवाई हल्ला करणा–याचा प्रयत्न पाकिस्तानने केला. यालाही भारताने करारा जवाब दिला आहे. भारत–पाक तणावानंतर अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी वेंस आणि चीनने मोठे विधान केले आहे. 'भारत–पाकच्या सुरु असलेल्या युद्धात अमेरिका सहभागी होणार नाही, ते आमचे काम नाही, अमेरिका भारत आणि पाकिस्तानाला नियंत्रित करु शकत नाही. पण दोन्ही देशांना अणुशक्तीचा वापर न करण्याचा सल्ला दिला आहे असे जे.डी. व्हान्स यांनी म्हटले आहे.

**तारकेश्वर गड विकासकामे**

विविध अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात संत–महंतांनी उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत करून त्यांना आशीर्वाद दिले. गडाच्या उन्नतीसाठी शासनकडून सातत्याने मदत केली जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त केला. गडावरील रस्ते, मूलभूत सुविधा आणि वारकऱ्यांसाठी आवश्यक सोयी–सुविधा उभारण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. वारकरी भाविकांत उपमुख्यमंत्र्यांच्या या घोषणेमुळे आनंदाचे वातावरण होते.

**पुलाच्या कठड्याला धडकून**

वाहनावर आदळली. धडकेत कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि दोघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी पोलिस उपनिरीक्षक भडके व बीट अंमलदार सचिन तांदळे यांनी तातडीने भेट देऊन पाहणी केली. मृतदेह बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते.अहमदपूर– अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंबा रस्त्यावर पाटोदा शहरानजीक असलेल्या बामदळ वाडा परिसरातील या पूर्ण रस्ता परिसरात दोन्ही बाजूने तीव्र उतार आहे. मध्ये पूल आहे. हा महामार्ग वर्दळीचा असून या ठिकाणी रात्रीच्या वेळी ट्रॅव्हल्स व इतर खासगी वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. २ वर्षांपूर्वी याच ठिकाणी याच जागी झालेल्या अपघातात चार ते पाच जणांना आपला जीव गमवावा लागला होता.

**सुशिल सोळंकेला आत्मसमर्पण**

आरोपीच्या आई विरुध्द प्रचार केला होता तसेच फिर्यादीने ग्रामपंचायत कारभारा विरुध्द उपोषण केले होते. आमच्या विरोधात उपोषण का करतोस या कारणावरुन सुशिल साळुंके व इतर ६ आरोपींनी फिर्यादीच्या दुकानात बेकायदेशिररित्या प्रवेश करुन फिर्यादीला लोखंडी रॉड व दगडाने मारहाण केली होती. तसेच दुकानातील संगणक व इतर वस्तुंची मोडतोड करुन फिर्यादीचे आर्थिक नुकसान केले होते.आरोपी सुशिल साळुंके याच्या विरोधात ग्रामस्थांना धमक्या देणे,मारहाण करणे अशा तक्रारी पोलीस स्टेशनला दाखल आहेत. तसेच सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा निर्माण करुन, धमकावुन त्यांना मारहाण करण्याच्या घटनेसंदर्भात सुशिल साळुंके याच्याविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झालेला आहे. सुशिल साळुंके याची गुन्हेगारी पार्श्वभुमी व प्रथमदर्शनी गुन्हयातील सहभाग या कारणास्तव उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता.अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी सुशिल साळुंके याने सर्वोच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केली होता.तथापी सर्वोच्च न्यायालयात, उच्च न्यायालयातीलच आदेश कायम करण्यात येत असल्याने आरोपीने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेला जामीन अर्ज काढून घेतलेल्या अर्जावर आरोपीने दोन आठवडयाच्या आत आत्मसमर्पण करुन न्यायालयात जामीन अर्ज दाखल करावा व असा जामीन अर्ज दाखल केल्यास न्यायालयाने तो गुणवत्तेच्या आधारावर तो निकाली काढावा असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे आरोपी सुशिल साळुंके याची अटक आता अटळ झाली आहे.

**पवार,मुंडेंचे हवाई**

नाशिकला येणार होत्या. मात्र, आता त्यांचा दौरा रद्द झाला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि उद्योजकांसोबत बैठक होणार होती. ही बैठक आता रद्द करण्यात आली आहे. दरम्यान, साकिनाका येथील एका धार्मिक स्थळाच्या वरती काही क्षणांसाठी एक ड्रोन सदृश वस्तू दिसली होती. त्यानंतर ती झोपडपट्टी भागाच्या दिशेने गेल्याचे काही नागरिकांनी सांगितले. ही माहिती सहार विमानतळावरून मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला देण्यात आली आणि त्यानंतर संपूर्ण सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली.

**कलेक्टरांचा बिनकामाचा**

शेतकऱ्यांना मावेजा न देताच शेतातुन विद्युत तारा ओढण्याचे काम पोलिस बंदोबस्तात जबरदस्तीने होत होते.याला शेतकऱ्यांनी विरोध केला त्यामुळे त्याठिकाणी काही काळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे हे सुद्धा शेतकऱ्यांच्या विनंती वरून घटनास्थळी पोहोचले. त्यांना शेतकऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांनी आर्थिक फसवणूक केली असुन मावेजा न देणे,कमी जास्त मावेजा देणे, न वटणारे धनादेश देणे व मावेजा मागितल्यावर पोलिस प्रशासनाच्या मदतीने दडपशाही असे प्रकार सुरू असल्याचे सांगितले.याविषयी उपस्थित पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके पाटोदा पोलिस स्टेशन यांच्याशी डॉ.गणेश ढवळे यांनी व शेतकऱ्यांनी संवाद साधला असता. सशुल्क पोलिस संरक्षण मागितल्याने आमची कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये हि आमची जबाबदारी असुन मावेजा मिळणे,काम थांबविणे आमच्या हातात नसुन तुम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडून काम थांबविण्याचे आदेश आणा असे सांगितले. त्यानंतर पाचेगाव येथील १० शेतकरी यांनी दुपारी भाड्याने गाडी करून पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात जिल्हाधिकारी यांना लेखी तक्रार दिली.त्यांना दुसऱ्या दिवशी जनता दरबारात बोलावले.काल दि.०८ गुरुवार रोजी आठवडी बाजार असतानाही शेतकरी पुन्हा भाड्याने गाडी करून जिल्हाधिकारी यांना भेटून मावेजा न देताच तारा ओढत असुन ते काम मावेजा मिळेपर्यंत थांबवावे अशी विनंती केली.जिल्हाधिकारी यांनी पवनचक्की कंपन्यांनी सशुल्क संरक्षण मागितले असल्याने मला काम थांबवता येत नाही असे म्हणत तुम्ही पाटोदा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना भेटून ते ठरवतील तो मावेजा घ्या.मला यात काहीही करता येत नाही असे सांगितले आणि पाटोदा येथील उपविभागीय अधिकारी अथवा तहसीलदार यांच्याशी फोनवरून सुचना न देताच आल्या पावली घरी पाठवले. त्यामुळे आता पिडीत शेतकऱ्यांना असा प्रश्न पडला की जिल्हाधिकारी यांच्या हातात काही नाही तर मग आम्हाला गाडी भाडे करून दुसऱ्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात का बोलावले????? त्यामुळे पाचेगाव शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या जनता दरबाराला बिनकामाचा दरबार भरत असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली.

## पान सहा वरून

**नागरिकांच्या सहनशीलतेचा**

उपस्थिती होती सदरील मोर्चा च्या निमित्ताने उपस्थित असलेल्या भारतीय जनता पार्टीचे मा. जिल्हा परिषद अध्यक्ष मीरा ताई गादले, शहराध्यक्ष अशोकजी लोढा , भारतीय जनता पार्टीच्या अँड संध्याताई राजपूत, नगरसेवक सय्यद इलियास, मुन्ना इनामदार, रुपाली देशपांडे, पठाण रेहानाताई, प्रीतताई कुकडेजा, सोनलताई पाटील, आदी आदींनी पाणीपुरवठा स्वच्छता व नगर परिषदेच्या गैरव्यवहार बाबत संबोधित केले यावेळी बोलताना लोकपत्रकार भागवत तावरे यांनी बीड नगर परिषदेमध्ये एकूणच चाललेला निरंकुश गैरव्यवहार व त्यामुळे होणारी बीड शहरातील नागरिकांची हेळसांड या प्रश्नावर आपले सविस्तर मत मांडले व सदरील मोर्चाचे आयोजक शेख निजाम यांनी आपल्या संबोधनांमध्ये बीड नगर परिषदेने आपले कर्तव्य समजून बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यावा ज्यात प्रामुख्याने विस्कळीत असलेला पाणीपुरवठा सुरळीत करून किमान आठ दिवसाला शहराला पाणीपुरवठा करण्यात यावा येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी बीड शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून युद्ध पातळीवर नालेसफाई व कचऱ्याची विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यात यावे व बीड शहरातील बंद अवस्थेत असणाऱ्या सर्व पथदिवे चालू करण्यात यावे अशा मागण्या वेळ मुख्याधिकारी नीता अंधारे यांना निवेदनात दिलेल्या मागण्या पालकमंत्री मा. अजित दादा पवार यांच्या सूचनेनुसार मान्य केल्या व तात्काळ आज पासून सुरळीतपणे पाणीपुरवठा व स्वच्छता व ईतर सर्व कामे पूर्ण करून करू अशी ग्वाही शिष्टमंडळास दिली यावेळी भव्य हंडा मोर्चात मोठ्या संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते व यामध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती.

**स्पर्धा परिक्षेत मिळविले यश**

आणि घरच्यांचा स्पोर्ट्स आणि आशिर्वादामुळेच सोपा होऊ शकला .या यशाच्या निमित्ताने मी स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याच्या सर्व विद्यार्थ्यांना एकच सांगू शकते स्वप्न मोठ पहा. ते मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा. आणि नेहमी लक्षात ठेवा की शांततेच्या काळात जितका अधिक घाम गाळाल, युद्धाच्या काळात तितकंच कमी रक्त सांडाल , स्वतःवर विश्वास ठेवा प्रयत्न थांबू नका यश नक्की मिळेल. या प्रवासात ज्यांनी मला अविरत साथ दिली माझ्यावर विश्वास ठेवला आणि मला मार्गदर्शन केले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार .

**खरीप हंगामाचे नियोजन**

घेण्याबाबत सूचना आ.सोळंके यांनी प्रशासनास दिल्या.कर्जवाटपा बाबत उद्दिष्ट पूर्ण करत असताना,जुन्या शेतकऱ्यांसह नवीन शेतकऱ्यांना विचारत घेऊन पीक कर्ज देण्याबाबत आराखडा तयार करून नवीन शेतकऱ्यांना पीक कर्जाचा लाभ देण्यासाठी बँकांनी प्रयत्न करावेत.पिक कर्ज वाटपाबाबत स्वतंत्र आढावा बैठक घेण्याबाबत नियोजन करण्याच्या सूचना ही यावेळी आ.प्रकाश सोळंकें यांनी दिल्या.

**रेतीची अवैधरित्या चोरटी**

श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, अनिल चोरमले, उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई,अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोहेकॉ नंदकिशोर परळकर,रामेश्वर खेत्रे,चालक,पोलीस अंमलदार सहाधु कोकाटे यांनी केली आहे.

**सुभाष बेदमुथा यांचे संथारा**

करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन मुले, दोन मुली, जावई, नातु असा मोठा परिवार आहे. बेदमुथ्था परिवाराच्या दु:खात पुण्यभूमी परिवार सहभागी आहे.

**धम्मरॅलीत सहभागी**

राहुल धम्म चळवळ गतिमान करण्यास सहकार्य करावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे यांनी केले

**आम्हा सर्वांसाठी ऊर्जा**

जाणून घेतली. खा.शरदचंद्र पवार साहेब म्हणाले, या ठिकाणी येण्याआधी भरत गिते यांच्याशी भेट झाली होती. त्यांनी त्यांच्या कार्याची सविस्तर माहिती माझ्यापुढे मांडली. मी त्यांच्याबद्दल आणि त्यांच्या संस्थेबद्दल काही लोकांकडून पूर्वीही ऐकलं होतं. त्यांच्या कार्यपद्धतीनं पवार साहेब प्रभावीत झाले आणि त्यांचा प्रकल्प प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा निर्माण झाली. त्यामुळे मी आज इथे आलो आहे. पुढे बोलताना पवार साहेबांनी महाराष्ट्रातील औद्योगिकीकरणाच्या वाटचालीवर भाष्य केलं. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी उद्योग उभारले खरे, पण त्यामागचा उद्देश इंग्लंडमधील कारखान्यांना आवश्यक असलेला कच्चा माल भारतातून घेऊन जाण्याचा होता, असे सांगितले. त्यांनी स्पष्ट केलं की स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राच्या औद्योगिकीकरणाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली ती यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकाळात. त्यांच्या नेतृत्वाखाली एमआयडीसी, महाराष्ट्र फायनान्स कॉर्पोरेशन, महाराष्ट्र विद्युत मंडळ यांसारख्या संस्थांची स्थापना झाली, ज्यामुळे राज्यात औद्योगिक पाया मजबूत झाला. त्यानंतर माझ्यासह वसंतराव नाईक, वसंतराव दादा पाटील यांच्या नेतृत्वात वशलशर्पीेरश्रळीशव (विकेंद्रित) औद्योगिक धोरण राबवण्यात आलं.

याच संदर्भात त्यांनी भरत गिते यांच्या प्रवासाचं विशेष कौतुक केलं. मराठवाड्याने निजामशाहीचा संघर्ष अनुभवला आहे. परळी, बीडसारख्या भागात नैसर्गिक परिस्थितीही प्रतिकूल आहे. अशा परिस्थितीतून झगडत पुढे आलेल्या, संघर्षातून तावून सुलाखून निघालेल्या व्यक्तींमध्ये भरत गिते यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांनी जर्मनीत जाऊन तांत्रिक शिक्षण घेतलं, तेथे नोकरी केली आणि त्या अनुभवाचा उपयोग करत शून्यातून एक अत्याधुनिक प्रकल्प चाकणमध्ये उभा केला आहे. ही गोष्ट प्रेरणादायी आहे. तसेच त्यांनी उद्योग, शेती आणि आयटी क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा मागोवा घेत, पिंपरी–चिंचवड, चाकण, रांजणगाव, शिरूर, बारामती, इंदापूर आणि भिगवन भागात झालेल्या औद्योगिक विकासाबद्दलही समाधान व्यक्त केलं. आज या ठिकाणी मी जे पाहिलं, ते खरोखरच आशादायक आहे. भरत गिते यांचा उद्योग या भागातील तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत ठरेल, याची मला खात्री आहे, असेही त्यांनी शेवटी नमूद केलं. ज्येष्ठ नेते खा.शरद पवार साहेब यांची तौरल इंडिया प्रा. लि. येथे झालेली सदिच्छा भेट ही आम्हा सर्वांसाठी ऐतिहासिक आणि गौरवाशाली असल्याचे प्रतिपादन संस्थापक भरत गित्ते यांनी व्यक्त केलं. खा.शरदचंद्रजी पवार साहेबांचे स्वागत करताना म्हटलं, साहेब, आपण स्वतः येथे आलात, त्याबद्दल मन:पूर्वक आभार. आजचा दिवस हे तौरल इंडियाच्या इतिहासातील एक उत्सवाचा आणि ऊर्जेचा क्षण आहे.

आपल्या दूरदृष्टीतून औद्योगिक, सहकारी आणि सामाजिक क्षेत्रात जे कार्य घडलं आहे, त्यातूनच आधुनिक महाराष्ट्राची घडण झाली आहे. आपल्या निर्णयक्षम नेतृत्वाचा ठसा गेल्या ५०–६० वर्षांच्या प्रत्येक टप्प्यावर स्पष्टपणे जाणवतो. तौरल इंडियाच्या प्रवासाविषयी सांगताना, गिते म्हणाले की, केवळ १० कर्मचाऱ्यांपासून २०१३ साली या कंपनीची सुरुवात केली आणि आज ती नवभारत घडविण्याच्या दृष्टीने ॲल्युमिनियम कास्टिंग पुरवठा करणारी एक विश्वासार्ह कंपनी बनली आहे. माझी जन्मभूमी मराठवाडा – ही संघर्षाची भूमी आहे, पण तितक्याच ताकदीचीसुद्धा. त्या मातीतूनच एक उद्योगपती म्हणून घडू शकलो. हे सहज शक्य नव्हतं, ती एक प्रकारची अग्निपरीक्षा होती. मात्र आपण आमच्या सारख्या तरुणांसाठी एक 'मराठवाडा व्हिजन' तयार केलात तर अनेक तौरल इंडिया घडू शकतात. शेवटी त्यांनी पवार साहेबांच्या भेटीबद्दल आनंद व्यक्त केला आणि पुढील प्रेरणादायी सहकार्याबद्दल आशा व्यक्त केली. यावेळी उपस्थित मान्यवरांशी, सर्व कर्मचारी वर्गाशी संवाद साधला तसेच ल्युमिनियम मॅन भरत गिते यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उपस्थितीमध्ये खा. निलेश लंके, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, रामराव गित्ते व विविध क्षेत्रात मान्यवर उपस्थितीत होते.

**राहुरीत खिस्ती भजन**

वितरण करण्यात येणार आहे या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय सुफी गायक पवनजी श्रीकांत नाईक यांची व सि खिस्तीना मोझेस उरणकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे तरी या स्पर्धेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन आराधना भजनी मंडळ डिग्रस व सेन्ह सदन चर्च राहुरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील दिग्गज भजनी मंडळ उपस्थित राहणार असल्याने या स्पर्धेला अनोखे महत्त्व प्राप्त झाले आहे संयोजकाकडुन स्पर्धेचे उत्कृष्ट असे नियोजन करण्यात आलेले आहे

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अँन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# बेस्ट प्रवास महागला; कसा, किती याचा तपशीलवार आढावा

| कि.मी | सध्याचे भाडे | नवीन वाढीव भाडे |
|---|---|---|
| ५ | ५ रुपये | १० रु. |
| १० | १० रुपये | १५ रु. |
| १५ | १५ रुपये | २० रु. |
| २० | २० रुपये | ३० रु. |
| २५ | २० रुपये | ३५ रु. |
| पुढे प्रत्येक पाच किमीसाठी ५ रुपये वाढ असणार आहे. | | |



**विना वातानुकूलित बसेसचे भाडे**

| वातानुकूलित बसेसचे भाडे | | |
|---|---|---|
| कि.मी | सध्याचे भाडे | नवीन वाढीव भाडे |
| ५ | ६ रुपये | १२ रु. |
| १० | १३ रुपये | २० रुपये |
| १५ | १९ रुपये | ३० रु. |
| २० | २५ रुपये | ३५ रु. |
| २५ | २५ रुपये | ४० रु. |
| पुढे प्रत्येक पाच किमीसाठी ५ रुपये वाढ असणार आहे. | | |

**बसपास - दैनंदिन - दर**
दैनंदिन पास - अमर्याद - ७५ रुपये
३० दिवसांचा पास - ९०० ऐवजी-१,८०० रु.

### ज्येष्ठ नागरीकांसाठी बसपास

ज्येष्ठ नागरीकांसाठी ६०, ९० व १२० बसफेऱ्यांसाठी मासिक बसपास उपलब्ध आहे. या बस पासमध्ये ज्येष्ठ नागरीकांसाठी ५० रुपये इतकी सवलत देण्यात येईल.

### दिव्यांग प्रवाशांना दिलासा!

अंध, ४० व त्यापेक्षा अधिक अंपगत्व असलेल्या दिव्यांग प्रवाशांना उपक्रमाच्या बस गाड्यांमधून मोफत प्रवासाची सूविधा देण्यात येते. या योजनेमध्ये देखील कोणताही बदल करण्यात आलेला नाही. या योजनेचा लाभ घेण्यासाठी बेस्ट उपक्रमाचे चलो स्मार्ट कार्ड, मोबाईल ॲप ओळखपत्र घेणे बंधनकारक आहे.

### टोल नाक्यावर २ रुपये अतिरिक्त प्रवास भाडे

टोल नाक्यावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून विना वातानुकूलित आणि वातानुकूलित बस सेवांवर २ रुपये अतिरिक्त प्रवास भाडे आकारण्यात येईल.

# चिपळूण बहादूरशेखचा जुना पूल पाडण्याचे काम अंतिम टप्प्यात

## पाणी वेगाने प्रवाहित होणार!

◆ चिपळूण (वार्ताहर):

शहराच्या महापुरास कारणीभूत असलेला बहादूरशेख नाका येथील वाशिष्ठी नदीवरील जुना पूल पाडण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत होती. अखेर हा पूल प्रशासनाने गेल्या चार महिन्यापासून पाडण्यास सुरुवात केली आहे. आता पूल पाडण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. हा पूल पाडण्यासंदर्भात माजी नगरसेवक अरुण भोजने यांच्यासह काहींनी पाठपुरावा केला होता. प्रशासनाला धन्यवाद दिले आहेत.

हा पूल शंभर वर्षांपूर्वी बांधलेला ब्रिटिशकालीन पूल आहे. हा पूल मातीच्या बंधाऱ्यावर ८० टक्के बांधलेला आहे. त्यामुळे १२५ मिलिमीटरच्या पुढे पाऊस पडला की या पुलास पाणी अडतं आणि ते संपूर्ण खेर्डी -कळंबस्ते आणि चिपळूण शहरात पसरते आणि पूर येत असे.

दरम्यान, मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणात वाशिष्ठी नदीवर नवा पूल बांधण्यात आल्यानंतर जुना पूल महापुरास कारणीभूत ठरत असल्याने तो तोडण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून सुरू झाली होती. यामध्ये माजी नगरसेवक अरुण भोजने यांनी यासंदर्भात पाठपुरावा केला होता. मात्र, काही राजकीय नेत्यांच्या भूमिकेमुळे हा पूल पाडण्यास विरोध दर्शवला. त्यामुळे वाशिष्ठी नदीवरून पूल पाडण्याबाबत अनिश्चितता होती. तरीही माजी नगरसेवक भोजने यांनी पाठपुरावा सातत्याने सुरूच ठेवला होता.

यानुसार गेल्या चार महिन्यांपासून बहादूरशेख नाका येथील वाशिष्ठी नदीवरील जुना पूल पाडण्याची सुरुवात झाली आहे. हा पूल पाडण्यासाठी १ कोटी २३ लाख ६९ हजार ४३५ रुपयांचा निधी मंजूर झाला. यानंतर फेब्रुवारी महिन्यात हा पूल पाडण्याच्या कामाला सुरुवात झाली होती व आता सदरील काम अंतिम टप्प्यात आले असून पुलाचे पूर्णतः स्ट्रक्चर काढून टाकण्यात यावे जेणेकरून पाणी वेगाने प्रवाहित होईल अशी मागणी होत आहे.



### गणेश विसर्जन घाटाचे काम लवकर होणे गरजेचे!

चिपळूण बहादूरशेखनाका येथील वाशिष्ठी पुलाजवळ नदी किनारी हजारो गणेश मूर्तींचे विसर्जन केले जाते. मात्र, हा जुना पूल पाडण्यात आला असल्याने गणेश मूर्ती विसर्जनासाठी वाशिष्ठी नदीकिनारी जाण्यासाठी दोन्ही बाजूला मार्ग करण्याबरोबरच दोन्ही बाजूला गणेश विसर्जन घाट बांधण्यात यावा, अशी मागणी गणेश भक्तांमधून होत आहे. तसे प्रशासनाने आश्वासन दिले होते. याबाबतची कार्यवाही लवकरच व्हावी, अशी मागणी होत आहे.

### महापुराचा ४०% धोका कमी होणार

हा पूल पाडल्यामुळे चिपळूण खेर्डीला महापुराचा ४०% धोका कमी होणार आहे. हा पूल मातीच्या भराव्याचा असल्यामुळे १५० मिलिमीटरच्या आसपास पाऊस पडला, तर या मातीच्या भरावाच्या पुलाला पाणी अडलं जात होतं. मग ते पाणी कळंबस्ते खेर्डी आणि खेर्डीतून सरळ कराड रोडने पाणी खाली चिपळूण शहरात येत होतं आणि त्यामुळे ते आलेलं पाणी परत नदीपात्रात जात नसल्यामुळे शहरात पूर परिस्थिती निर्माण होत होती ती परिस्थिती आता होणार नाही, अशी प्रतिक्रिया माजी नगरसेवक अरुण भोजने यांनी दिली आहे.

## वेचक

### हातखंबा जंगलात अनोळखी पुरुषाचा मृतदेह

**रत्नागिरी :** रत्नागिरी ग्रामीण पोलीस स्थानकाच्या हद्दीत बुधवारी सायंकाळी हातखंबा बोबलेवाडी गिर्दा येथे सुमारे ४० ते ४५ वय असणाऱ्या अनोळखी पुरुषाचा मृतदेह जंगलमय भागात मिळून आला असून पोलिसांनी तपास सुरु केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बुधवारी संध्याकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास हातखंबा बोबलेवाडी येथे ४० ते ४५ वयोगटातील पुरुषाचा मृतदेह असल्याची माहिती ग्रामीण पोलिसांनी पोलीस पाटील यांनी दिली. त्याचा मृत्यू सुमारे ४ ते ५ दिवसांपूर्वी झाला असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. अधिक तपास ग्रामीण पोलीस करत आहेत.

### एसटी कंडक्टरकडून वृद्ध प्रवाशाला मारहाण

**रत्नागिरी :** रत्नागिरी आगारातील एका एसटी बसच्या वाहकाने सुट्या पैशांवरून एका वृद्ध प्रवाशाला मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. मारहाणीत जखमी झालेल्या वृद्ध प्रवाशाला जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सुरेश गोपाळ गुरव (वय ६७, रा. खेडशी, रत्नागिरी) असे मारहाण झालेल्या प्रवाशाचे नाव आहे. ही घटना मंगळवारी (दि. ६) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास नाखरे ते पावस एसटी बसमध्ये घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वृद्ध प्रवासी सुरेश गुरव हे नाखरेहून पावसकडे येत असताना त्यांच्याकडे तिकीटासाठी सुटे पैसे नव्हते. याच कारणावरून त्यांची बसमधील वाहकाशी बाचाबाची झाली. यानंतर संतप्त झालेल्या वाहकाने गुरव यांना धक्काबुक्की केली, ज्यामुळे ते जखमी झाले. त्यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद गुरव यांनी जिल्हा रुग्णालयाच्या पोलीस चौकीत केली असून रहाटाघर बस स्थानकातील अधिकाऱ्यांनी या घटनेची माहिती घेतली आहे. याप्रकरणी पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### सावंतवाडीत नवचंडी महायज्ञ उत्साहात

**सावंतवाडी :** सावंतवाडी तालुक्यातील देवसू-श्री देवी शेंडोबा माऊली मंदिर, दाणोली-श्री देवी लिंग माऊली मंदिर, केसरी-श्री स्वयंभू मंदिर देवस्थान या तीन गावचे देवस्थान एकच असून यावर्षी तीनही गावांमध्ये नवचंडी महायज्ञ सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या तीनही मंदिरांमध्ये नवचंडी याग, दत्त याग, भजन, कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम व तीनही दिवस दोन वेळचे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

आजूबाजूच्या पंचवीस गावांतील सिमधाड्यांच्या उपस्थितीत व हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा धार्मिक कार्यक्रम पार पडला. या नऊ दिवसांच्या उत्सवाला तिनही गावांत मिळून दहा ते पंधरा हजार भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन तीनही गावच्या मानकऱ्यांनी केले होते. यामध्ये प्रमुख हनुमंत सावंत, विठ्ठल सावंत, बाळकृष्ण सावंत, भाई सावंत (मास्तर), सचिन सावंत, राजन सावंत, बाबा सावंत, लिंगोजी सावंत, शाम सावंत, जनार्दन जाधव, अरविंद सावंत, दिनेश सावंत, यशवंत सावंत, मकरंद सावंत यांनी हिरहिरीने भाग घेऊन कार्यक्रम उत्साहात यशस्वीपणे पार पाडला. आजही पंचक्रोषीत कार्यक्रमाच्या आयोजकांची वाखाणणी होत आहे.

### मोती तलावात संगीत कारंजा, लेझर शो

सावंतवाडी : गेले अनेक दिवस मोती तलावाच्या काठावर असलेला संगीत कारंजा अखेर पाण्यात उतरविण्यात आला असून त्याचे पहिले प्रात्यक्षिक बुधवारी झाले. या संगीत कारंजामुळे सावंतवाडी शहरातील पर्यटनाला झळाळी मिळणार आहे. कारंजे आणि लेझर शोचे मोठे स्ट्रक्चर तलावात उतरविण्याचे काम पूर्ण झाले आहे.

सावंतवाडी शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आमदार दीपक केसरकर यांनी तब्बल साडेतीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी लागणारे सर्व साहित्य शहरात दाखल झाले होते. त्यानंतर रंगीत कारंजे आणि लेझर शोचे भव्य स्ट्रक्चर तलावाच्या काठावर तयार करण्यात आले होते. दोन दिवसांपूर्वी हे आकर्षक स्ट्रक्चर आता सुरक्षितपणे मोती तलावात उतरविण्यात आले आहे. या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध असल्याने हे काम वेळेत पूर्ण होण्याची शक्यता आहे. रंगीत कारंजे आणि लेझर शोच्या नयनरम्य दृश्य बघायला मोठ्या संख्येने पर्यटक दाखल होतील, ज्यामुळे निश्चितच शहराच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल.

# पावसाळ्याआधीच सुकी मासळी महागली

## ‘एलईडी’ मच्छीमारीचा फटका : कोकणात खवय्यांच्या खिशाला फटका



◆ खेड (प्रतिनिधी) :

पावसाळा जवळ आल्यावर मत्स्यप्रेमींच्या ताटात सुक्या मासळीचा हक्काची शिदोरी असते. मात्र, यावर्षी सुकी मासळी सामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. कोकण किनारपट्टीवर एलईडी मच्छीमारी पद्धतीचा वाढता प्रभाव पारंपरिक मासेमारीच्या अडथळा ठरत आहे. त्यामुळे सुक्या मासळीचा पुरवठा घटला आहे. परिणामी, अगोटच्या बेगमीसाठी लागणाऱ्या सुक्या माशांचे दर गगनाला भिडले

खेड परिसरातील सुक्या मासळी बाजारात सध्या खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी दिसत असली, तरी विक्रेते मात्र नाराज आहेत. अनेक महिला विक्रेत्या ग्राहकांची वाट पाहत बसलेल्या दिसत आहेत. पावसाळ्यात मासेमारीस बंदी असल्याने सुकी मासळीच खवय्यांची शेवटची आशा असते. परंतु, एलईडी मच्छीमारीमुळे पारंपरिक जाळ्यांत मासे सापडत नसल्याने, सुकविण्यासाठी लागणाऱ्या माशांची कमतरता भासत आहे.

या परिस्थितीमुळे बाजारातील दर प्रचंड वाढले आहेत. यंदा ढोमा २००, चेवनी ३००, कोलीम १५०, आंबड काड ४००, बोंबील ४००, बगी ३००, आणि सोडे तब्बल १००० प्रति किलोने विकले जात आहेत. सध्या अगोटसाठी बाजारात सरगर्मी असली तरी यंदा मासेमारीतील ही अडचण कोकणातील मच्छीमार समाजाच्या उपजीविकेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

एलईडी मच्छीमारीमुळे आमच्या हातात मासेच राहत नाहीत - प्रतिभा कालेकर

हर्णे दापोली येथील पाज पंढरी गावातील महिला विक्रेता प्रतिभा कालेकर सांगतात, "आम्ही वर्षानुवर्षे पारंपरिक पद्धतीने मासे सुकवत आलोय, पण एलईडी मच्छीमारीमुळे आमच्या हातात मासेच राहत नाहीत. ग्राहकही आता किमती ऐकून मागे फिरतात. याचा परिणाम सुक्या मासळी विक्री वर होत आहे.

# जगबुडी किनारी कचऱ्यात कोंडतोय ‘श्वास’

## कचरा जाळून लावली जातेय विल्हेवाट

◆ खेड (प्रतिनिधी)

शहरातील कचरा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. जागेअभावी कचरा प्रकल्पाचे घोंगडे अजूनही भिजत पडले आहे. सद्यस्थितीत समर्थ नगर येथे जाळून कचऱ्याची विल्हेवाट लावली जात आहे. दिवसभर धुमसणाऱ्या कवयात समर्थनगरच्या रहिवाशांचा स्वास कोडत असल्याने आरोग्य धोक्यात आले आहे.

शहरातून दिवसाकाठी जमा होणाऱ्या होणाऱ्या ८ टनाहून अधिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नगर प्रशासनाकडे अजूनही हक्काची जागा नाही एकीकडे नगर प्रनासन 'स्वच्छ खेड, सुंदर खेडचा डांगोरा पिटत कचरामुक्त शहरासाठी झटत असली तरी जागेअभावी कचराप्रश्न ऐरणीवर आला आहे. कचरा ची जागा पदरात पडलेली नाही. यामुळे कचऱ्याची विल्हेवाट लावायची तरी कुठे, असा प्रश्न नगरप्रशासनाला सतावत आहेत.



डम्पिंग ग्राऊंडमध्ये कचारा सर्रासपणे जाळला जात आहे. आधीच कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे समर्थनगर येथील रहिवासी बेजार झाले आहेत. त्यात धुमसणाऱ्या कचऱ्यामुळे आरोग्य ची टांगती तलवार कायम आहे. समर्थनगर येथील रहिवाशांनी कचरा टाकण्यास मज्जाव करत त्यांच्या संतापाचा उद्रेक झाला होता. शहरातून गोळा होणारा कचरा समर्थनगर येथे आणून डम्पिंग करण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे सुरू आहे. कचरा सर्रासपणे जाळला जात असल्याने धुमसणाऱ्या कचऱ्याचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. एकप्रकारे समर्थनगरच्या रहिवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. चारच दिवसांपूर्वी कचरा डेपोत धुमसणाऱ्या कचऱ्यामुळे आगडोंब उसळल्यानंतर नगर प्रशासनाची त्रेधातिरपीट उडाली होती. कचराप्रश्नी योग्य ती तोडगा न काढल्यास आक्रमकतेचा अवलंब करावा लागेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# गोव्यात १७ मेपासून सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव

◆ गोवा (प्रतिनिधी) :

सनातन संस्थेच्या वतीने १७ ते १९ मे या कालावधीत फर्मागुडी, फोंडा येथील गोवा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर होणारा ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव’ हा केवळ धार्मिक नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील आध्यात्मिक जागृतीचा महोत्सव ठरणार आहे. २३ देशांतील प्रतिष्ठित मान्यवर, विविध संप्रदायांचे संत-महंत, मंदिरांचे विश्वस्त आणि २५ हजारांहून अधिक साधक, भाविक यांचा सहभाग अन् यज्ञयागामुळे हा महोत्सव काशी, उज्जैन, अयोध्येप्रमाणे आध्यात्मिक पर्यटनाचा नवा अध्याय असणार आहे, त्यामुळे विकासालाही गती मिळणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस यांनी आज पणजी येथील पत्रकार परिषदेत दिली.

पणजी येथील ‘हॉटेल मनोशांती’मध्ये आयोजित पत्रकार परिषदेला आर्ट ऑफ लिव्हिंगचे संतोष घोडगे, सांस्कृतिक न्यासाचे जयंत मिरिंगकर, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे नितीन फळदेसाई, कुंडई तपोभूमी येथील पद्मनाभ संप्रदायाचे सुजन नाईक, ब्राह्मण महासंघाचे राज शर्मा, जगद्गुरु स्वामी नरेंद्राचार्य महाराजांचे अनुयायी अनिल नाईक, गोमंतक मंदिर महासंघाचे जयेश थळी आणि हिंदू जनजागृती समितीचे युवराज गावकर उपस्थित होते.

‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’त १ हजार वर्षांपूर्वीच्या सोरटी सोमनाथ जोतिर्लिंगाचे दर्शन घेण्याची दुर्मीळ संधी सर्वांना मिळणार आहे. आता ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’चे संस्थापक गुरुदेव श्री रविशंकरजी यांच्या आशीर्वादाने आता हे शिवलिंग महोत्सवाच्या ठिकाणी १७ ते १९ मे या कालावधीत लोकांच्या दर्शनासाठी ठेवले जाणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळतील शस्त्रात्रांचे प्रदर्शनही लावण्यात येणार आहे.

### विजांच्या कडकडाटांसह पावसाने उडवली नागरिकांची धांदल

**रत्नागिरी (वार्ताहर) :** तालुक्यासह जिल्ह्यात पारा दोन दिवस कमालीचा वाढला होता. गुरुवारी सकाळी मात्र वाढलेला पारा अचानक खाली आला आणि विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट अन् सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस कोसळला. या अचानक आलेल्या पावसाने आंबा शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले. झाडावरील आंबा फळ वाऱ्यामुळे गळून पडले. तसेच हापूसची साट, पापड, कोकम अशा अनेक सुके पदार्थ तयार करणाऱ्या गृहिणींची त्रेधातिरपीट उडाली.

रत्नागिरीतील ग्रामीण भागात विजेच्या कडकडाटांसह गुरुवारी सकाळी कोसळलेल्या पावसाने सर्वांची दाणादाण उडवून दिली. मे महिन्यामध्ये अनेक चाकरमानी आपल्या बच्चे कंपनीसह कोकणात फिरण्यासाठी आलेले असताना सकाळीच पावसाने हजेरी लावली. त्यामध्ये विजांच्या कडकडाटांसह व ढगांचा गडगडाटासह आलेला पाऊस सर्वांच्या मनात भीती निर्माण करणारा ठरला. अजून पावसाळा सुरू व्हायला एक महिना असतानाच अचानक आलेल्या पावसाने हापूस आंबा बागायतदार शेतकरी तसेच घरांची दुरुस्तीची कामे करणारे तसेच नवीन घर शाकारणारे नागरिक यांची तारांबळ उडाली. काहींनी आपले गुरांचे गोठे तसेच पावसाळ्यापूर्वीची विविध प्रकारची कामे करण्यासाठी कामगार बोलावले होते. अनेक ठिकाणी पावसाळ्यामध्ये जनावरांसाठी लागणारे गवताचे साठे करून ठेवले होते. ते साठेही भिजून गेले व मोठे नुकसान झाले आहे.

# लाहोरजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त

## पाकिस्तानी हवाई संरक्षण दलाच्या प्रणालीचे ड्रोन हल्ल्यात मोठे नुकसान

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

पाकिस्तानच्या एचक्यू-९ एअर डिफेन्स मिसाईल लाँचर्सच्या एअर डिफेन्स युनिट्सचे मोठे नुकसान झाले आहे. ही मूळ चीनची जमिनीवरून हवेत मारा करणारी लांब पल्ल्याची क्षेपणास्त्र प्रणाली आहे. जी पाकिस्तानच्या संरक्षण नेटवर्कचा एक महत्त्वाचा भाग मानली जाते. ड्रोन हल्ल्यांत पाकिस्तानी हवाई संरक्षण दलाच्या प्रणालीचे मोठे नुकसान झाले आहे. पाकिस्तान चीनच्या हवाई संरक्षण प्रणालीचा वापर करतो. त्यांची ८० टक्क्यांहून अधिक शस्त्रे चिनी बनावटीची आहेत.



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर प्रत्युत्तरादाखल भारताने सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर अजूनही चालू असल्याचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी गुरुवारी सकाळी सर्वपक्षीय बैठकीत सांगितले. त्याच्या काही तासांत संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनामध्ये भारतीय लष्कराने थेट पाकिस्तानच्या लाहोरजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त केल्याचे नमूद करण्यात आले आहे. पाकिस्तानकडून होणाऱ्या कारवायांना जशास तसे उत्तर दिले जाईल, असा स्पष्ट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

### पाकिस्तानमधील अनेक ठिकाणी हवाई संरक्षण रडारना लक्ष्य

भारतीय हवाई दलाच्या एस-४०० सुदर्शन चक्र हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणालीने रात्री भारताच्या दिशेने येणारे हल्ले निष्प्रभ केले. भारतीय सैन्याने मंगळवारी मध्यरात्री ऑपरेशन सिंदूर सुरू केले. पाकिस्तानमधील ९ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त केली. पाकिस्तानने भारतातील १५ लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यानंतर सशस्त्र दलांनी गुरुवारी पाकिस्तानमधील हवाई संरक्षण रडारना लक्ष्य केले.

बुधवारी पहाटे केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळ लक्ष्य केले होते.

# ऐन मे महिन्यात राज्यात वादळी पावसाचा इशारा

**नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

◆ पुणे (वार्ताहर) :

वादळी पाऊस आणि ढगाळ हवामानामुळे कमाल तापमानात मोठी घट झाली आहे. त्यामुळे उन्हाचा चटका आणि उकाडा कमी झाला आहे. शुक्रवारी मध्य महाराष्ट्र आणि पूर्व विदर्भात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता असल्याने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. उर्वरित महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता आहे. पुणे शहरामध्ये गेल्या आठवड्याभरात कमाल तापमानात तब्बल सात अंश सेल्सिअसची घट झाली आहे. गेल्या आठवड्यात पुणे शहरातील कमाल तापमान ४० अंशांपर्यंत नोंदवले गेले होते. पण गुरुवारपासून कमाल तापमानात मोठी घट झाली.

सकाळी आगमनास पोषक वातावरण असल्याने १३ मे पर्यंत मॉन्सून अंदमान आणि निकोबार बेटांवर दाखल होण्याचे संकेत आहेत. याचाही परिणाम हवामानावर होत आहे. राज्यात वादळी पाऊस आणि गारपिटीने हजेरी लावली आहे. कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, मध्य महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, नगर आणि पुणे जिल्ह्यात तसेच विदर्भ, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली. गुरुवारी (दि. ८) सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये मराठवाड्यातील धाराशिव व विदर्भातील ब्रह्मपुरी येथे राज्यातील उच्चांकी ४० अंश तापमानाची नोंद झाली. पावसाळी हवामानामुळे तापमानात मोठी घट दिसून आली आहे.

## मोजणीत होणाऱ्या फसवणुकीस आळा बसणार

# जमीन मोजणी प्रक्रियेत मोठे बदल; शेतकऱ्यांचे वादही मिटणार!

**खेड (वार्ताहर) :**
भूमी अभिलेख विभागाने शेतजमिनीच्या मोजणी प्रक्रियेत सुसुत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी एकाच सर्वे क्रमांकातील पोटहिश्शांची मोजणी करताना एकत्रित मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.
या सूचनांनुसार, मोजणीसंदर्भात शेजारच्या जमीनमालकांना नोटीस देण्याची प्रक्रिया अधिक स्पष्ट करण्यात आली आहे.
या नोटिसा स्पीड पोस्टद्वारे पाठवण्यात येणार असून, त्याची पोहोच झाल्यानंतरच मोजणी सुरू होणार आहे. मोजणीपूर्वी संबंधित जागेवर मोजणीचे फलक लावणे बंधनकारक असून, त्या फलकाचा फोटो वेळ व दिनांकासह GIS पोर्टलवर फोटो अपलोड करावा लागणार आहे.



प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी पुढील पावले उचलली जाणार मोजणीसाठी अर्ज करणाऱ्या शेतकऱ्यांनी शेजारील जमीनमालकांची माहिती अर्जातच द्यावी लागणार आहे. जागेचा कच्चा नकाशा आणि चतुःसीमेची माहिती अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. संबंधित जागेच्या खरेदीखताची प्रत आणि हक्क संपादनाचा पुरावा देखील द्यावा लागेल, जेणेकरून चुकीची जागा मोजली जाणार नाही. या प्रक्रियेमुळे एकाच जागेच्या मोजणीत होणाऱ्या फसवणुकीस आळा बसेल.

### नियम व सुधारणा यामागील उद्दिष्ट

महाराष्ट्र जमीन महसूल नियम, १९६९ नुसार उपविभागातील पोट हिश्शांची मोजणी, आकारणी आणि खर्च वसुली यासाठी ठरवलेले नियम वेळोवेळी सुधारित करण्यात आले आहेत. सातबारा धारकांची संख्या जास्त असलेल्या गटांमध्ये स्पष्ट नकाशे नसल्यामुळे वाद निर्माण होतात. हे वाद टाळण्यासाठी व मोजणी प्रक्रिया पारदर्शक आणि न्याय्य करण्यासाठी सुधारित कार्यपद्धती लागू करण्यात आली आहे.

### मोजणीनंतर काय?

मोजणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित जागेचा नकाशा ग्रामपंचायत कार्यालयात आणि ‘आपली चावडी’ पोर्टलवर दहा दिवसांसाठी प्रसिद्ध केला जाईल. या कालावधीत कुणी आक्षेप घेतल्यास, संबंधित अधिकाऱ्याने सुनावणी करून अंतिम निकाल द्यावा लागेल.

# कृष्णतारा प्रतिष्ठानतर्फे संस्कार उत्सव

◆ कुडाळ (वार्ताहर):

प्रत्येक अपयशाला यशात परिवर्तीत करण्याची ताकद ही श्रद्धेत आणि भक्तीत आहे. त्यामुळे प्रयत्न थांबवू नका, यश तुमच्यापर्यंत चालत येईल, असे प्रबोधन कीर्तनकार ह.भ.प. शिवलीला ताई पाटील (बार्शी ) यांनी आपल्या किर्तनात मांडून भाविकांना विविध दाखले देऊन जगात ठामपणे उभे राहण्याचा संदेश दिला. स्व. कृष्णा महादेव सातार्डेकर आणि तारामती कृष्णा सातार्डेकर यांच्या स्मरणार्थ दरवर्षी धार्मिक संस्कार उत्सवाचे आयोजन कृष्णतारा प्रतिष्ठानतर्फे करण्यात येत असते. यंदा प्रसिद्ध कीर्तनकार शिवलीलाताई पाटील(बार्शी) यांचे कीर्तन आणि भजन, पूजापाठ, महाप्रसाद अशा अनेक धर्मसंस्कृतीची जपवणूक करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन कृष्णतारा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विलास कृ. सातार्डेकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. त्यात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उत्सवात सहभाग घेतला. जन्मदात्यांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे आणि त्यांच्याबद्दल आजन्म कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले कर्तव्य आहे आणि ही सेवा विलास सातार्डेकर हे अशा धार्मिक उत्सवातून प्रामाणिकपणे श्रद्धेने भक्तीने करीत असतात. त्याबद्दल कोकणवासियांतर्फे विलास सातार्डेकर यांचे गावकऱ्यांनी आभार मानले. यावेळी सातार्डेकर कुटुंबीय उपस्थित होते. या संस्कार उत्सवाच्या आयोजन समितीत शिवांश, सुमित, अक्षय सातार्डेकर आणि प्रथमेश पावसकर, सुरेश म्हाडदळकर, मंदार गोवेकर, प्रदीप पेडणेकर यांचा समावेश होता.



# रोहित पर्व विसावले

भारतीय क्रिकेट इतिहासामधील महत्त्वाचे पान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून तडकाफडकी निवृत्ती घेतली. भारतीय कसोटी संघाचा कर्णधार म्हणून रोहित शर्माने आपल्या फलंदाजीच्या जोरावर जागतिक पातळीवर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. काही महिन्यापूर्वीच टी-२० प्रकारातून रोहित शर्माने निवृत्ती जाहीर केली होती. आयपीएल स्पर्धा मध्यावर आलेली असताना रोहित शर्माने आपली निवृत्ती जाहीर केल्याने क्रिकेटप्रेमींकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. ज्या खेळाडूला आपण कधी आणि केव्हा थांबावे, हे जेव्हा समजते, त्याच खेळाडूला मान-सन्मानाने निवृत्ती मिळते. रोहित शर्मा हा खऱ्या अर्थाने मुंबईकर खेळाडू. मुंबईच्या अनेक खेळाडूंनी भारतीय संघाच्या कर्णधारपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळलेली आहे. कसोटी क्रिकेटमध्ये ज्याने प्रथम दहा हजार धावांचा टप्पा ओलांडला, त्या सार्वकालिक महान अशा सुनील गावस्करांपासून, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री, सचिन तेंडुलकर अशा विविध रथी-महारथींचा त्यात समावेश होत आहे. एकेकाळी मुंबईच्याच खेळाडूंचा सर्वाधिक भरणा भारतीय क्रिकेट संघामध्ये पाहायला मिळत असे. पण जिथे भरती आहे, तिथे ओहोटी ही असतेच. जीवनात चढ-उतार हे येतच असतात. एकेकाळी भारतीय संघामध्ये प्राबल्य असणाऱ्या मुंबईकर खेळाडूंना आज त्याच भारतीय संघामध्ये अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, यशस्वी जैयस्वाल, शिवम दुबे अशी नावे आज भारतीय संघातील कोणत्या ना कोणत्या फॉरमॅटमध्ये चमकताना पाहावयास मिळत आहेत. त्यातील यशस्वी जैयस्वालने मुंबईची साथ सोडून आगामी हंगामापासून गोवा क्रिकेटला आपलेसे करण्याचा निर्णय घेतला. शिवम दुबे अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. रोहित शर्मानंतर केवळ सूर्यकुमार यादवच्याच रूपाने सध्या तरी मुंबई क्रिकेटचे अस्तित्व भारतीय संघात पाहावयास मिळणार आहे. ही दुनिया उगवत्या सूर्याला नमस्कार करणारी आहे. जोपर्यत चलती आहे, तोपर्यंतच मान-सन्मानाला गती आहे. एकदा गती मंदावली की समाजात, आप्तस्वकियांमध्ये कोणी फारसे ओळखत नाही. तसाच काहीसा प्रकार अलीकडच्या काळात क्रिकेट खेळामध्ये रुजू झाला आहे. जोपर्यंत तुमच्या बॅटमधून धावांचा कारखाना सुरू आहे, जोपर्यत तुमच्या गोलंदाजीवर बळी मिळवत आहात, तोपर्यंतच तुमचे संघामध्ये स्थान निश्चित आहे. एकदा का तुमच्या बॅटमधून धावा येण्याचा वेग मंदावला, तुमच्या गोलंदाजीवर बळी मिळणे अवघड झाले की संघाचे दरवाजे तुम्हाला बाहेर पडण्यासाठी उघडले जातात. जागतिक पातळीवर नावलौकीक मिळविलेल्या खेळाडूला अशा प्रकारची 'आऊंटगोईंग' ही अपमानास्पदच असते. सुनील गावसकर हा चांगला खेळत असताना, अगदी शेवटच्या कसोटी सामन्यात पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात ९६ धावा केलेल्या असतानाही या 'अवलियाने' युवकांना संघात संधी मिळावी म्हणून वयाच्या ३३-३४व्या वर्षी निवृत्ती पत्करली. नाहीतर आजचे खेळाडू वयाची चाळीशी जवळ आली अथवा उलटली तरी निवृत्ती घेण्याचे नाव घेत नाहीत. मग अशा खेळाडूंची संघातून 'गंच्छती' ही ठरलेली असते.

रोहित शर्माला आज-ना उद्या क्रिकेटच्या कसोटी खेळातून निवृत्ती ही घ्यावी लागणार होतीच. त्याच्या बॅटमधून धावा निघत नव्हत्या, तसेच त्याच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाला कसोटी मालिकेमध्ये सातत्याने अपयशाचा सामना करावा लागत होता. आयपीएल स्पर्धेतही रोहित शर्मा हा गेल्या दोन सामन्यांत चांगली फलंदाजी करू शकला नव्हता. त्याचबरोबर रोहित शर्मा हा फक्त इम्पॅक्ट प्लेअर म्हणूनच खेळत होता. निवृत्ती जाहीर केल्यामुळे आता तो कसोटी क्रिकेटमध्येही खेळणार नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. आयपीएलनंतर भारतीय संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार होता. त्यासाठी रोहित शर्माची निवड होणार की नाही, याची चर्चा सुरू होती. पण निवड समितीने संघ निवडण्यापूर्वीच आपण कसोटी क्रिकेट खेळणार नसल्याचे आता रोहित शर्माने स्पष्ट केले आहे. रोहित शर्मा यापूर्वी ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात कर्णधार होता. या दौऱ्यात रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताला पराभव पत्करावा लागला होता. या पराभवामुळे भारताला 'डब्ल्यूटीसी'च्या फायनलमध्ये खेळता आले नव्हते, पण त्यानंतर रोहित शर्मावर भारतीय क्रिकेटप्रेमींकडून, माजी खेळाडूंकडून जोरदार टीका झाली होती. रोहित शर्माला अखेरच्या कसोटीत खेळवलेच नव्हते. त्यावेळी रोहित शर्मा काहीच म्हणाला नव्हता. पण आता इंग्लंड दौऱ्यावर निवडच होणार नसल्याचे स्पष्ट झाल्यावर रोहित शर्माने अखेर कसोटी क्रिकेट न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमध्ये चांगले नेतृत्व केले होते. विराट कोहलीनंतर रोहितने भारतीय कसोटी संघाला एक चांगल्या उंचीवर नेले होते. पण गेल्या मालिकेत मात्र रोहितच्या बॅटला सूर गवसला नव्हता. रोहित शर्माशिवाय भारतीय क्रिकेटचे कधीकाळी पानही हलत नव्हते, अर्थांत रोहितच्या कारकिर्दीतील हा सुवर्ण काळ होता. टी-२० एकदिवसीय सामने, कसोटी सामने अशा तीनही फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व रोहित शर्मानी केलेले आहे. भारतीय संघाचे नेतृत्व टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर २९ जून २०२४ रोजी निवृत्ती जाहीर होईपर्यंत शर्मा भारताच्या ट्वेंटी-२० आंतरराष्ट्रीय संघाचा कर्णधार देखील होता. ७ मे २०२५ रोजी तो कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झाला आणि कर्णधार म्हणून तीन वर्षांचा कार्यकाळ संपला. त्याने कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळली. मुंबई इंडियन्स, इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये एक फ्रँचायझी संघ, १० वर्षे संघाचे नेतृत्व केले आणि त्यांना पाच जेतेपदे मिळवून दिली. शर्मा त्याच्या फलंदाजीच्या कौशल्यासाठी ओळखला जातो आणि त्याचे चाहते त्याला 'हिटमॅन' असे टोपणनाव देतात. तो कधीकधी ऑफ-स्पिनर देखील असतो. शर्मा हा एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन द्विशतके करणारा एकमेव खेळाडू आहे. सर्व फॉरमॅटमध्ये सर्वाधिक आंतरराष्ट्रीय षटकार, विश्वचषकांमध्ये सर्वाधिक षटकार आणि एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक वैयक्तिक धावसंख्या करण्याचा विक्रमही त्याच्या नावावर आहे. तो २००७ चा टी-२०आय विश्वचषक, २०१३ चा आयसीसी (आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद) चॅम्पियन्स ट्रॉफी आणि २०२४ चा टी-२०आय विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा सदस्य होता. षटकार मारावे तर सौरव गांगुली आणि रोहित शर्मानेच असे आजही भारतीय क्रिकेटप्रेमींकडून बोलले जात आहे. भारतीय वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळणाऱ्या व भारताला १९८३ साली प्रथमच विश्वचषक मिळवून देणाऱ्या कपिलदेव निखंजने हॅडलीच्या कसोटीतील ४३१ बळींचा विक्रम मोडण्यासाठी आपली कारकिर्द लांबवली व ४३४ बळी झाल्यावर खेळातून निवृत्ती घेतली. शेवटच्या काळात तर कपिलची गोलंदाजी दोन ते तीन टप्पा पडत होती. यशाच्या सर्वोच्च शिखरावर असणाऱ्या रोहित शर्माला सूर हरवताच निवृत्ती जाहीर करावी लागली. हिटमॅनची निवृत्ती ही चाहत्यांना हळहळ लावणारी आहे.

# रोहित शर्माःरॅग्ज टु रिचेस कहाणी




भारतात आणि जगातही असे अनेक खेळाडू होऊ गेले की ज्यांची कहाणी प्रेरणादायक तर आहेच, पण ती रॅग्ज टु रिचेस कथा सांगणारी आहे. त्यातीलच एक म्हणजे आपला मुंबईचा क्रिकेटपटू रोहित शर्मा. रोहित म्हणून ओळखला जाणारा या क्रिकेटपटूने कालच कसोटी क्रिकेटमधून संन्यास जाहीर केला. त्याच्या आयुष्याची कहाणी ही कोणत्याही बॉलिवूडपटू नायकाच्या कथानायकाला साजेशी आहे. त्यात सारे काही आहे. म्हणजे संघर्ष आहे तसेच यशाला एकदा गवसणी घातल्यावर मागे वळून न पाहणेही आहे.. हिटमॅन तो कसा बनला याची कहाणी प्रत्येकाला प्रेरणादायक तर आहेच, पण अंगात जिद्द असली आणि खेळाची प्रतिभा असली, तर रंकाचा राव होतो याचे प्रेरणा देणारी आहे.

रोहित शर्माचा जन्म नागपूरचा. पण तो मुंबईत राहिला आणि लहानाचा मोठा झाला. त्याचे आई-वडील अत्यंत गरीब होते. वडील हरिनाथ शर्मा यांची कमाई जास्त नव्हती. त्यामुळे रोहितने आपल्या संघर्षाच्या दिवसात घरोघरी जाऊन दूधही विकले होते. असे त्यानेच एका मुलाखतीत सांगितले. रोहितकडे क्रिकेटचे किट घेण्यास पैसे नसणार हे उघड होते. पण त्याचे मित्र आणि काकांनी मिळून कसेबसे पैसे जमवून त्याला क्रिकेट क्लबचे सदस्य करून घेतले. त्यानंतर रोहितचा संघर्ष संपला नाहीच. त्यानंतर त्याने क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. त्याच्याकडे शाळेची फीस भरण्यास पैसे नसत. रोहितचे बालपण हे संघर्षाने भरलेले होते. त्याचे वडील एका खासगी कंपनीत केअर टेकर म्हणून काम पाहत. पण त्यांनी रोहितला कसेबसे करून क्रिकेट अकादमीपर्यंत पोहोचवले आणि मग रोहितने अंगभूत गुणांच्या जोरावर उडी मारली. तो अंडर १९ क्रिकेट खेळायला लागला आणि त्याला प्रशिक्षक लाभले ते दिनेश लाड यांच्यासारखे. त्यांनी रोहितमधील गुण पारखले आणि तो सुरुवातीला गोलंदाज म्हणून खेळायला लागला. त्यानंतर त्याने फलंदाजी स्वीकारली आणि तो चांगला फलंदाज म्हणून नावारूपाला आला. रोहितकडे आज विशाल बंगले आहेत आणि करोडो रुपयांची संपत्ती आहे. पण सुरुवातीच्या दिवसात तो डोंबिवलीतील एका खोलीत राहत होता. पण स्वप्न पाहणे कधीही सोडू नये. एक ना एक दिवस ते खरे होतातच आणि त्यासाठी मार्ग मात्र चांगले वापरले पाहिजेत. रोहितच्या उदाहरणावरून हेच लक्षात येते.

रोहित आपल्या काकांशी क्रिकेटवर चर्चा करत असे. त्याची क्रिकेटचे ज्ञान पाहून त्याच्या काकांनी कसेबसे पैसे जमवले आणि त्याला एका छोट्याशा क्रिकेट अकादमीत प्रवेश मिळवून दिला. त्यानंतर त्याने पुढच्या शिक्षणासाठी रिझवी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. अखेर रोहितला मुंबई क्रिकेट सापडले आणि तो मुंबई क्रिकेटचा अहम भाग बनला. क्रिकेट करिअर बनवण्यात रोहितसमोर आव्हान त्याची गरिबी होती. पण त्यावर त्याने मात केली आणि तो आज देशातील टॉपचा क्रिकेटर म्हणून निवृत्त झाला.

रोहितने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती का घेतली याबाबत वेगवेगळे तर्क वितर्क लढवले जात आहेत. पण ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर सातत्याने अपयश येत असल्याने निवड समितीने त्याला कसोटी क्रिकेट कर्णधारपदावरून दूर करण्याचा निर्णय घेतला होता. तसे त्याला कळवण्यात आले. त्यामुळे त्याने अगोदरच निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. कोणत्याही खेळाबाबत असा संकेत आहे की, तुम्ही का निवृत्त होत आहात असा प्रश्न विचारण्याच्या आत तुम्ही निवृत्त झाला पाहिजेत. अन्यथा कपिल देव यांच्यासारखी स्थिती होते. रोहितने तसा उशीरच केला.

निवड समितीने निर्णय घेण्यापूर्वीच निवृत्त होण्याचा निर्णय रोहितने घेतला असता, तर त्याच्या निर्णयात शान राहिली असती. पण रोहितला निदान उशिरा तरी कळले. पण धोनीला ते अजूनही कळत नाही. त्याने आयपीएलमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेण्याची वेळ कधीच निघून गेली आहे. त्याला सारेच लोक कंटाळले आहेत. ते असो. पण रोहितच्या नंतर भारताचा कसोटी कर्णधार कोण हा कळीचा प्रश्न आहे. शुभमन गिल आणि जसप्रीत बुमराह यांची नावे आघाडीवर आहेत. के एल राहुलही चांगला कसोटी कर्णधार होऊ शकतो. बुमराह सध्या उपकर्णधार आहे. त्यामुळे त्याच्याकडे सूत्रे हाती देण्यापूर्वी निवड समिती या दोन नावांचा विचार करेल.



उमेश कुलकर्णी
प्रासंगिक

रोहितने २०१९ च्या विश्वचषक स्पर्धेत पाच शतके ठोकली होती. ते रेकॉर्ड विस्फोटक फलंदाजीचा नमुना होते. टी-२० मध्ये रोहितच्या नावावर सर्वात जास्त चार शतके लावण्याचा रेकॉर्ड कायम आहे. एकदिवसीय सामन्यात दुहेरी शतक लावण्यात सचिननंतर रोहित असा एकमेव खेळाडू आहे की ज्याने तीन वेळा दुहेरी शतक केले आहे. रोहितने ६७ सामने खेळले आणि ११६ डावांमध्ये त्याने ४३०१ धावा




केल्या. १२ शतके आणि १८ अर्धशतके आहेत. पण आकडेवारीवरून क्रिकेटपटूची महानता सिद्ध होत नाही. रोहितने ज्या पद्धतीने आणि ज्या परिस्थितीत क्रिकेट खेळले, ती त्याची महानता सिद्ध करणारी आहे. २००७ मध्ये त्याने पदार्पणातच शतक ठोकले होते.

रोहितवर शेकडो आरोपही झाले. तसे ते अनेक क्रिकेटपटूंवर झाले. पण त्यामुळे त्यांच्या क्रिकेट कारकीर्दीला ग्रहण लागले नाही. रोहित आता निवृत्त होत आहे. पण तो आयपीएल खेळतच राहणार आहे. पण त्याची अनुपस्थिती जाणवेल हे निश्चित. कारण रोहितमुळे मधल्या फळीला आकार आला होता आणि सलामीला, तर तो प्रचंड फॉर्मात होता. ते क्षण भारत आता कधीही जगू शकणार नाहीत. रोहितची ही कहाणी आहे, ती रॅग्ज टु रिचेस...

# रेस्टॉरंटमधील सर्व्हिस चार्ज : एक अनुचित वसुली

महेश आपल्या कुटुंबाला घेऊन दिल्लीच्या एका हॉटेलमध्ये गेला. बऱ्याच दिवसांनी कुटुंबातील सगळेजण एकत्र जेवायला जमले, गप्पा-टप्पा झाल्या, वेटरकडून बिल मागवून महेश बिल तपासत होता तेव्हा त्याला असे दिसून आले की, हॉटेलने सेवा बिलाची रक्कम लावलेली होती. वास्तविक सर्व्हिस चार्ज रेस्टॉरंटना लावता येत नाही किंवा लावायचा असेल तर ग्राहकाच्या पूर्वपरवानगीने लावता येतो. ग्राहकांसाठी तो ऐच्छिक आहे, हे महेश ऐकून होता. त्याने वेटरला याबद्दल स्पष्टीकरण मागितले. त्यावर महेश आणि त्या रेस्टॉरंटच्या मॅनेजर बरोबर याबाबत चर्चा केली. मॅनेजरने सर्व्हिस चार्ज बिलातून काढून टाकण्याचे मान्य केले आणि त्यानुसारच पैसे घेतले. वास्तविक हे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. याबाबत हल्लीच मध्यवर्ती ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने दिल्लीच्या ५ रेस्टॉरंटना फटकारले असून त्यांना ग्राहकाकडून वसूल केलेल्या सर्व्हिस चार्जेस परत करण्यास सांगितले आहे. असे करताना दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्देशांचा हवाला दिला. मखना दिल्ली, झेरो कोर्टयार्ड, कॅसल बार्बेक्यू, छायोस आणि फिएस्टा बाय बार्बेक्यू



नेशन ही त्या दिल्लीतील रेस्टॉरंटस ची नावे आहेत. नॅशनल कंझ्युमर हेल्पलाईनवर याबाबतच्या तक्रारींचा पाऊस पडला होता ज्याच्या संदर्भाने राष्ट्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने स्वतः हून हा कारवाईचा बडगा उगारला आहे. ग्राहकाच्या पूर्वपरवानगीशिवाय अशा प्रकारे सर्व्हिस चार्ज ग्राहकाकडून वसूल करणे हा अनुचित प्रथा असल्याचे नमूद करून प्राधिकरणाने ग्राहक संरक्षण कायदा २०१९ च्या अनुषंगाने या रेस्टारंटसना नोटीस बजावून या वसूल केलेल्या रकमा ग्राहकांना परत करण्याचे बजावले आहे. प्राधिकरणाने ही दखल घेताना म्हटले आहे की ग्राहकाच्या पूर्वपरवानगीशिवाय असे सेवेच्या नावाखाली सर्व्हिस चार्ज लावणे किंवा इतर कुठल्याही नावाखाली ग्राहकाकडून पैसे वसूलणे अत्यंत अनुचित आहे. दिनांक ४ जुलै २०२२ रोजी राष्ट्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने याबाबतचे खालील स्पष्ट दिशानिर्देश दिले आहेत :

मधुसूदन जोशी
मुंबई ग्राहक पंचायत

* खाद्यपदार्थांच्या बिलामध्ये सर्व्हिस चार्ज आपोआप जोडला जाऊ नये.

* इतर विविध नावाखाली छुप्या रीतीने सर्व्हिस चार्ज बिलामध्ये जोडला जाऊ नये.

* ग्राहकाला सर्व्हिस चार्ज हा पूर्णपणे पर्यायी व ऐच्छिक असल्याबद्दल स्पष्ट कल्पना दिली जावी.

* रेस्टॉरंटमध्ये दिल्या जाणाऱ्या सेवा या सर्विस चार्जच्या आधीन नाहीत, म्हणजे पैसे दिले तरच सेवा मिळेल ही अट नाही.

* ऐच्छिक असलेले सर्व्हिस चार्ज बिलामध्ये जोडून त्यावर जीएसटी लावणे अनुचित आहे असे करता येणार नाही.

माननीय दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक २८ मार्च २०२५ च्या निकालपत्रात राष्ट्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाचे हे दिशानिर्देश बरोबर असल्याचे नमूद केले. त्यामुळे ग्राहक संरक्षण कायद्याखाली ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या प्राधिकरणाच्या निर्णयाला बळ मिळते. माननीय उच्च न्यायालयाच्या निकालाच्या नंतर सुद्धा राष्ट्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आले आहे की, बरीच रेस्टॉरंटस या नियमांची पायमल्ली करत असून ग्राहकांच्या दुर्लक्षाने त्यांना लुबाडले जात आहे.

ग्राहकांच्या सोयीसाठी (NCH) नॅशनल कंझुमर हेल्पलाईन १८००११४००० किंवा १९१५ या क्रमांकावर ग्राहकांनी आपल्या तक्रारी नोंदवाव्यात अथवा nch-ca@gov.in या वेबसाईटवर आपल्या तक्रारी नोंदवाव्या असे आवाहन प्राधिकरण करतेच आहे; परंतु मुंबई ग्राहक पंचायत ही ग्राहक शिक्षण आणि संरक्षणासाठी गेली ५० वर्षे कार्यरत असेलेली भारतातील ग्राहक चळवळीतील अग्रगण्य संस्था सुद्धा याबाबत जनजागृतीसाठी कटिबद्ध आहे. ग्राहक म्हणून जागरूक राहा आणि जेव्हा जेव्हा रेस्टारंटमध्ये जाल तेव्हा आपल्या बिलामध्ये सर्व्हिस चार्जच्या नावाखाली किंवा इतर नावाखाली रक्कम वसूल केली जात नाही ना याची खात्री करून घ्या, असे छुपे चार्जेस दिसत असतील तर लगेच ते त्या रेस्टारंटच्या निदर्शनास आणून द्या आणि असे चार्जेस वगळायला भाग पाडा, त्याची तक्रार निश्चित करा.


# नैतिक शिक्षण आणि बालक

बालकांचं वर्तन, कृती याचा विचार केला आणि समोर येणाऱ्या बालकाचे प्रकरण अभ्यासले, तर मन खिन्न होऊन जातं. काही अशा घटना ज्यात बालक पीडित असतात आणि काही अशा घटना ज्यात बालकाकडून चूक झाली असते वा अज्ञानतेमुळे विधी संघर्षात म्हणून ते बाल न्याय मंडळा पुढे जातात. काही समाज विघातक घटनांशी बालक जोडले जातात. कधी बालक अजाणतेपणी त्या घटनांचा भाग होतात.

पीडित बालकांना कधी कधी याची जाणीव देखील नसते की, कोणीतरी आपलं शोषण केलं आहे. बाल कल्याण समितीत माझ्या पुढे येणाऱ्या पॉक्सो पीडित बालिका इन्स्टाग्रामवर एखाद्या मुलाशी बोलतात काय, आणि त्याने बोलवलं की अगदी आपलं गाव, शहर, राज्य देखील सोडून त्या व्यक्तीच्या मागे निघून जातात. नंतर त्यांना कळतं की, तो व्यक्ती खोटा आहे. त्याचे फोटो खोटे असतात. तो दुसराच कोणीतरी तिच्या वयाने खूप मोठा कधी तर बालिकेच्या वडिलांच्या वयाचा देखील असतो. कुठल्यातरी प्रलोभनाला बळी पडून ही छोटीशी बालिका आपलं घर आपलं सुरक्षित छत्र सोडून बाहेर पडते. ती कुठे कुठे भरकटत जाते. त्या व्यक्तीने तिचे शोषण केलं तरी त्याला वाचवायचा प्रयत्न करते. बालिकेचे समुपदेशन करून तिला सगळ्या गोष्टी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. त्या बालिकेला त्यावेळी आपल्या घरी आई-वडील आपली कळजी करत असतील याची जाणीव नसते. एखाद्या लॉजवर जाऊन अनोळखी व्यक्तीला भेटणं हे तिला चुकीचे वाटत नाही. तिचे वेगळ्या पद्धतीने फोटो घेतले जातात याची तिला काळजी वाटत नाही. त्या फोटोचा दुरुपयोग होऊ शकतो बालिकेला याची जाणीव होत नाही. नैतिक शिक्षण आणि या अशा घटना यांचा परस्पर काय संबंध आहे. याची चर्चा आपण करणारच आहोत. नैतिक शिक्षण म्हणजे व्यक्तींना नैतिक दुविधा सोडवण्यासाठी मदत करणे आणि त्यांच्या कृतींचे परिणाम समजावणे. नैतिक शिक्षणामुळे बालकांमध्ये नैतिक विकास होतो आणि ते योग्य आचरण करण्यास प्रोत्साहित होतात. नैतिक शिक्षणामुळे मुलांमध्ये सहानुभूती, निष्पक्षता आणि इतरांच्या गरजा आणि अधिकारांची काळजी वाढते. त्यामुळे बालक योग्य-अयोग्य गोष्टीचा अर्थ समजू लागतात. हे नैतिक शिक्षण मिळण्याचे मार्ग बाधित झाले आहेत वा नैतिक शिक्षण बालकापर्यंत त्या गांभीर्याने पोहोचवण्यासाठी आपण सगळे कुठे तरी कमी पडत आहोत. याचा अभ्यास आणि शोध घेणं निश्चितच आवश्यक आहे. आज ही भयाण परिस्थिती निर्माण झाली आहे की बालक वेगवेगळ्या प्रकाराने अत्याचाराला बळी पडत आहेत. किंबहुना स्वतःला अडचणीत टाकत आहेत. यासाठी आपण सगळेच सम प्रमाणात कमी पडत आहोत.



डॉ. राणी खेडीकर
अध्यक्ष, बाल कल्याण समिती पुणे




पालक म्हणून शिक्षक म्हणून समाज म्हणून आपण बालकाकडून कोणती अपेक्षा प्रथम स्थानी ठेवली आहे आणि त्यासाठी होणारी आपली कृती बालकाला कोणत्या दिशेने मार्गस्थ होण्यास कारणीभूत ठरत आहे या बाबत चर्चा आवश्यक आहे. मी जेव्हा शाळा मध्ये बालकांना भेटायला जाते, त्यांच्याशी संवाद साधते, त्यावेळी मी किती बालकांच्या दप्तरात नैतिक शिक्षण अर्थात moral science या विषयाचं पुस्तक आहे का? असं विचारते. तेव्हा अगदी दोन ते तीन टक्के बालकाच्या दप्तरात ते पुस्तक असतं. एकतर त्याच्या अधिकतर पानाचे विमान बनवून उडवले असतात किंव्हा ते पुस्तक अगदी नवीन कोरं असतं. या विषयाच्या तासाला गणित विज्ञान किंव्हा इतर विषयाचे तास घेतले जातात. good habits बाबत बालकांना सांगितलं जातं, पण आठवड्यातून एकदा असा तास घेतला जातो. पालक पण कधी बालकाला विचारत नाही की, आज नैतिक शिक्षण, मूल्य शिक्षण या तासाला काय शिकवलं. अभ्यास केला का एवढंच विचारतात आणि ते ही विषय ठरलेले असतात.

माझं मुलं एक चांगला व्यक्ती, चांगला नागरिक होण्यासाठी अभ्यास करतेय की नाही. याची काळजी किंव्हा आवश्यकता पालकांना वाटते का? नीतिमत्ता या विषयाशी बालकाची ओळख व्हावी त्याचा अभ्यास व्हावा आणि बालकाने ते कृतीत आणावं यासाठी शाळा प्रयत्न करतेय का, पालकांच्या कृतीतून ते पोहोचते आहे का? समाजात या गोष्टी बघायला मिळत आहेत का? हे मूलभूत प्रश्न बालकांच्या वर्तनावर परिणाम करत असतात. आपल्या आई वडिलांशी खोटं बोलून त्यांना न सांगता एखादी छोटीशी बालिका मग कोणी अनोळखी व्यक्तीच्या मोहात घर सोडून निघून जाते. कोणी लहानसा बालक दुसऱ्या लहान बालकावर अत्याचार करतो. एका सकाळी काही अल्पवयीन बालक एखाद्या आजी-आजोबा वर सुरीने वार करतात. बालक बालकांचे गट तयार होऊन समाज विघातक घटना घडवून आणतात. कोणी बालिका तिच्याच घरातील व्यक्तीकडून खाऊ, पैसे, नवीन कपडे देऊ केल्यास स्वतःच शोषण करू देण्यास तयार होते. यात तिला गैर असं काही वाटत नाही. कारण 'काही होत नाही'... 'त्याला काय होतं'... 'सब चलता हैं'... या तत्त्वावर हल्लीची पिढी पुढे चालली आहे. आज प्रामुख्याने नैतिक शिक्षण हा विषय बालकांपर्यंत त्यांना कळेल समजेल, उमजेल त्या पद्धतीने पोहोचणं आवश्यक आहे. या विषयावर आणखी काही घटना, अभ्यास, कृती योजना आणि त्याची अंमलबजावणी यावर आणखी चर्चा होणं आवश्यक आहे.

### सैनिकहो तुमच्यासाठी...

भारतीय नागरिकाचा घास रोज अडतो ओठी... सैनिक हो तुमच्यासाठी... हे गाणं सर्वांना परिचित आहे. हे सैनिक स्वतःच्या जीवावर उदार होऊन प्राणपणाने देशाचे रक्षण करतात. या सैनिकांना आपण ओळखत नाही तसेच ते आपले कोणी नातेवाईकही लागत नाही. ते आपल्यासाठी अपरिचितच असतात. असे असून देखील देश सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी ते जीवावर उदार होऊन स्वीकारतात. कोणत्याही क्षणी काहीही होऊ शकत याची जाणीव यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना असते. अशा सैनिकांचा संपूर्ण देशवासीयांना अभिमान असायला हवा. पहेलगाम येथील दुर्दैवी घटनेनंतर पाकिस्तानच्या हद्दीत घुसून भारतीय सैन्याने जो पराक्रम गाजवून देशप्रेम सिद्ध केले त्याला त्रिवार वंदन करायला हवे. या सैनिकांमुळेच आपण देशात सुखाने आणि सुरक्षितपणे जगू शकतो. या सैनिकांप्रती सदैव कृतज्ञच राहायला हवे.

**- शंकर पवार,** सातारा

### भारताने सामर्थ्य दाखवले...

शिवाजी महाराजांचा गनिमी कावा म्हणजेच जवळजवळ आताचे सर्जिकल स्ट्राइक आणि त्याचाच वापर करून युद्ध न करता ही अनेकदा आपली ताकद दाखवता येते जिंकता येते. तेच हिंदुस्थानाने पहलगाम मध्ये झालेल्या हल्ल्याचे प्रतिउत्तर देऊन नऊ ठिकाणी एकाच वेळी हल्ला करून पाकिस्तान सारख्या अतिरेकी देशाला आणि जगाला दाखवून दिले. पाकिस्तानातील अतिरेकी तळ उध्वस्त करून अतिरेक्यांना मारुन जगाला पाकिस्तान अतिरेकी देश आहे आणि तो अतिरेक्यांना संरक्षण देतो प्रशिक्षण देतो आणि मग हेच अतिरेकी हिंदुस्थानाबरोबर जगाला त्रास देतात. पाकिस्तानला अतिरेकी राष्ट्र घोषित करण्यास हरकत नाही हे आज हिंदुस्थानने जगाला दाखवून दिले आहे.

**- मयूर प्रकाश ढोलम,** जोगेश्वरी

जनसंवाद

### दहशतवाद असाच संपवावा लागतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढून दहशतवाद कसा संपवायचा? हे सिद्ध करून दाखवले आहे. त्याचप्रमाणे भारतीय सैन्याने पाकिस्तानमध्ये घुसून तेथील दहशतवादी तळ उद्ध्वस्त करून जो पराक्रम गाजवला त्याला सलामच करायला हवा. औरंगजेबाच्या या वंशजांमध्ये क्रौर्य ठासून भरले आहे. याची पाळेमुळे मुळासकट उपटून काढायला हवीत. ऑपरेशन सिंदूर मोहिमेच्या माध्यमातून भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला आहे तरीही खोडसाळ पाकिस्तान वारंवार भारताच्या खोड्या इथून पुढे देखील काढणार आहे. पाकिस्तानने केलेल्या प्रत्येक खोडीला तेवढे चोख तर द्यायला पाहिजे. पाकिस्तानची नांगी ठेचायला पाहिजे.पाकिस्तानी दहशदवाद अशाच पध्दतीने संपवायलाच हवा.

**- प्रकाश जोशी,** सातारा.

### राजकारणाचे राग आळवणे..

एकेकाळी शिवसेना म्हटले की हिंदुत्व, मराठी बाणा डोळ्यांसमोर यायचे दुसरे म्हणजे शिवसेनेचे ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण असायचे. महाराष्ट् नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांच्या बाबतीत थोडीफार तीच बाब आहे. पाकिस्तानी पुरस्कृत आतंकवादींनी केलेल्या काश्मीरमधील पहलगाम भ्याड हल्ल्यात दहशतवाद्यांनी त्याच्या बायकांना मोदींना जाऊन सांगा असे निर्लज्जपणे सांगितले. गेली अनेक वर्षे पाकिस्तान या आतंकवाद्यांना आपल्या देशात पोसण्याचे काम करीत असून त्या द्वारा आपल्या विरुद्ध एक प्रकारचे युद्ध सुरू ठेवले आहे ही गोष्टी दिसत असताना या विरुद्ध केंद्र सरकारने एअर स्ट्राइक करीत तेथील अतिरेक्यांचे तळ उध्वस्त केले असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनी युद्ध हा पर्याय नसल्याचा सूर आळवले तर उद्धव ठाकरे पक्षाच्या वतीने या दहशतवादी हल्ल्याबद्दल बेताल वक्तव्य, विधाने ऐकावी लागली.

**- अविनाश देशपांडे,** पुणे

## राशिभविष्य

शुक्रवार,९ मे २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती वैशाख शुद्ध द्वादशी शके १९४७. चंद्र नक्षत्र हस्त. योग वजीर, चंद्र राशी कन्या, भारतीय सौर १९ वैशाख शके १९४७ म्हणजेच शुक्रवार दिनांक ९ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.०६, मुंबईचा सूर्यास्त ०७.०३, मुंबईचा चंद्रोदय ०४.२६, मुंबईचा चंद्रास्त ०४.२१ उद्याची, राहू काळ १०.५७ ते १२.३५, प्रदोष, महाराणा प्रताप जयंती तारखेप्रमाणे, शुभ दिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष :** गृहसौख्य चांगले राहील.

**वृषभ :** जीवनसाथीची साथ मिळेल.

**मिथुन :** घरातील सदस्यांशी समन्वय राहील.

**कर्क :** भाग्योदय होईल.

**सिंह :** नवीन गुंतवणूक करता येईल.

**कन्या :** महत्त्वाच्या कामात यश मिळेल.

**तुळ :** सामाजिक कार्यात सक्रिय योगदान द्याल.

**वृश्चिक :** कुटुंबातील समस्या समजावून घ्या.

**धनु :** आरोग्याची काळजी घ्या.

**मकर :** कार्यक्षेत्रात वर्चस्व राहील.

**कुंभ :** नवीन कामे मिळतील.

**मीन :** प्रवासाची शक्यता.



## काव्यकोडी

**एकनाथ आव्हाड**

### दिनदर्शिका

महिन्यानुसार ही
बदलते पाने
रोज नव्या दिवसाचे
गाते नवे गाणे

ऑफिस, घर, शाळेत
हमखास दिसते
बारोमास भिंतीवर
लटकून बसते

वारांना जोड सांगे
सण, उत्सवांची
जयंती, पुण्यतिथी
कळे थोरामोठ्यांची

पंचांगातील सारेच
ठेवते ही मांडून
मराठी महिन्यांची
महती जाते सांगून

सूर्योदय, सूर्यास्त
पौर्णिमा, अमावस्या
सांगते राशींची
दशा आणि दिशा

कुणी म्हणती कॅलेंडर
कुणी दिनदर्शिका
अचूक तारीख, वार
पटकन सांगते बरं का!

१) कान मोठे, तोंड छोटे
शेपटी आहे लांब
सतत कुरतडण्याची
सवय याची घाण

धान्याची नासाडी हा
फारच करत असतो
मांजराला पाहून कोण
बिळात जाऊन बसतो?

२) लवचिक शरीर, तीक्ष्ण
नखे
अंगावर केस खूप
पाळीव प्राणी म्हणून
प्रसिद्ध तिचे रूप

म्याँव म्याँव करून
घरभर बसते खेळत
उंदराच्या मागे मागे
कोण असते पळत?

३) नदी, पाण्यात डुबणारी
दलदलीत लोळणारी
कधी शिंगे उगारून
शत्रूमागे पळणारी

कोळशासारखा रंग काळा
शरीर मजबूत तिचे
दूध देते भरपूर
नाव काय हिचे?

उत्तर -
१) उंदीर
२) मांजर
३) म्हैस

eknathavhad23 @gmail.com

## चित्र रंगवा बक्षीस जिंका

चित्र रंगवून
ई-मेल करा आणि
बक्षिसे जिंका
चित्रासोबत नाव
व पत्ता लिहून
पाठवणे.

kilbil@
prahaar.co.in

**चित्र रंगवा आणि बक्षीस मिळवा...**

चित्र रंगवून कात्रण ई-मेल करा अथवा टपालाद्वारे गुरुवारपर्यंत पाठवणे.

स्पर्धकाचे नाव, फोटो शाळेचे नाव व ठिकाण, इयत्ता, घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक.

सर्वोत्कृष्ट चित्र रंगवणाऱ्या विजेत्याला बक्षीस आणि प्रसिद्धी दिली जाईल.

प्रहारचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही.





**चित्र रंगवा विजेती :**
**आर्या योगेश बागड**
शाळा : एम जे इंटरनॅशनल एच -104, तुलसी आरंभ, पॉवर हाऊस जवळ, खरवई, बदलापूर (पूर्व).



परीक्षक : मनिषा दिवाकर जाधव
मुख्याध्यापिका
सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.





# दवधनुष्य कसे असते?

आनंदराव हे त्यांचा नातू स्वरूपला सोबत घेऊन नित्यनेमाने रोज सकाळी बाहेर फिरायला जायचे. रस्त्याने जाता-येता ते स्वरूपला बरीच माहिती सांगायचे.

"इंद्रधनुष्याबद्दल तुला तर माहिती आहेच. त्या दिवशी पांढऱ्या धनुष्याची माहिती मी तुला सांगितली. तसेच हिरवळीवर दवधनुष्यसुद्धा निघते." आनंदराव बोलले.

"काय सांगता आजोबा?" डोळे विस्फारून त्यांच्याकडे बघत स्वरूप म्हणाला, "तुम्ही तर रोज एकेक नवनवीनच माहिती सांगत आहात."

"होय स्वरूप, माझा नातू आहेच तसा जिज्ञासू व हुशार. म्हणून मला जे जे माहीत आहे ते ते सर्व मी त्याला सांगणारच." आजोबा सांगू लागले, "हिवाळ्याच्या दिवसात सकाळी झाडाझुडपांच्या, वनस्पतींच्या पानांवर दव पडलेले असते. अशा हिरवळीमध्ये बऱ्याचदा सूर्योदयानंतर इंद्रधनुष्य दिसते. ते पानांवरील दवामुळे निर्माण होते म्हणून त्याला दवधनुष्य असे म्हणतात. सूर्यकिरणे व आपल्या डोळ्यांची पातळी यामध्ये किमान ४२ अंशांचा कोन होऊन तो कोन जेव्हा पृथ्वीच्या पृष्ठभागाला छेदतो तेव्हाच दवधनुष्य निर्माण होते व आपणास दिसते. सूर्यकिरण दवबिंदूतून जातांना दवबिंदूत त्यांचे पृथक्करण म्हणजे विभाजन होते व दवबिंदूतच त्यांचे परावर्तन झाल्यास बाहेरच्या हिरवळीवर दवधनुष्य दिसते; परंतु आकाशातील इंद्रधनुष्य हे कमानीसारखे गोलाकार असते, तर हे हिरवळीतील दवधनुष्य अर्धलंबगोलाकार वा अर्धअंडगोलाकृती आकाराचे दिसते."

दोघांनीही आता परतीची वाट धरली. एवढ्यात स्वरूपचे लक्ष तारेवर बसलेल्या पोपटांकडे गेले व तो आनंदाने म्हणाला, "आजोबा, ते पोपट बघा त्या तारांवर बसून कसे छान झोके घेत आहेत. त्यांना विजेचा शॉक नाही का लागत? ते कसे छान मिठू-मिठू बोलतात."

"पोपटाला माणसांसारखे बोलता येत नाही, पण पोपटाची जीभ मानवाच्या जीभेसारखीच असून पोपट हा माणसाच्या आवाजाचे अनुकरण करतो. तो गळा, तोंड व जिभेच्या साहाय्याने शब्दानुसार ठराविक कंपन असलेला विशिष्ट ध्वनी बाहेर काढतो. त्यालाच आपण पोपटपंची म्हणतो." आनंदराव सांगत होते.

"स्वरूप, आता प्रथम तुला विजेचा धक्का किंवा शॉक कसा लागतो ते सांगतो. विजेच्या तारेला जेव्हा आपला स्पर्श होतो किंवा चुकून बोट बटनात जाते त्यावेळी वीज आपल्या शरीरातून प्रवाहित होऊन जमिनीत जाते व विद्युतमंडल पूर्ण झाल्याने आपल्याच शरीरातून वाहणाऱ्या विजेचा आपणांस धक्का बसतो. तेच आपण विजेसोबत काम करतांना जर पायांत रबरी चपला वापरल्या किंवा लाकडी पाटावर वा लाकडी बाकड्यावर उभे राहून काम केले, तर रबर व लाकूड हे विद्युतरोधक असल्याने विद्युतमंडल पूर्ण होत नाही व आपल्या शरीरातून वीज वाहत नाही आणि आपणांस विजेचा धक्का बसत नाही."

"विजेच्या तारा या खांबावर लावतांना विद्युतरोधक पदार्थ व वस्तू वापरून बसवलेल्या असतात. त्यामुळे त्यांचा खांबाशी व पर्यायाने जमिनीशी काहीच संपर्क येत नाही म्हणूनच तारांमधून वाहत असलेल्या विद्यूतचा सुद्धा खांबाशी व जमिनीशी काहीच संपर्क न आल्याने आपणांस विद्यूत खांबाला हात लावला तरीही वीजधक्का बसत नाही. तसेच पक्षी हे कोणत्याही एकाच तारावर बसतात, या तारेवरून त्या तारेवर फिरतात. अशा वेळी त्यांचा दुसऱ्या तारेला स्पर्श होत नाही. त्यामुळे विद्युतमंडल पूर्ण न झाल्याने त्यांना वीजधक्का बसत नाही." आनंदराव एकदम सोप्या भाषेत सांगत म्हणाले, "आलं ना लक्षात."

"हो. आजोबा." स्वरूप म्हणाला.

असे रमत गमत ते दोघेही नाताजले घरी पोहोचले.



कथा
**प्रा. देवबा पाटील**

# चिऊताई करी घाई!



कथा
**रमेश तांबे**

एक होती चिऊताई
तिला असायची नेहमीच
घाई
उडताना घाई, खाताना घाई
काम करतानासुद्धा घाई!
तिच्या मैत्रिणी तिला सांगायच्या,
"अगं चिऊताई दमाने घे जरा
काही करताना विचार जरा करा"
पण ऐकेल ती चिऊताई कसली
त्यामुळे एकदा ती
चांगलीच फसली!

त्याचे काय झाले,
एका शिकाऱ्याने
आंब्याच्या झाडावर
लावले होते जाळे
दिसायला होते ते
कितीतरी काळे
चिऊताईला मैत्रिणी
म्हणाल्या,
"जाऊ नको तिकडे अडकून
पडशील
मग वाचवा वाचवा म्हणत रडत
बसशील"
पण तिने ऐकलेच नाही
म्हणाली तुम्ही सारे वेडाबाई
कसले जाळे आणि कसले फाळे
मनात तुमच्या विचारच काळे!

मग चिऊताई गेली उडून भुर्कन
आंब्याच्या झाडावर बसली
पटकन
बाजूलाच होता पिवळाधमक
आंबा
कोण तिला सांगणार
जरा थोडं थांबा!
मारल्या चोची
पटापटा चार
आंब्याच्या रसाची
लागली धार
गोडगोड रस
चिऊताई प्यायली
पोटभर खाऊन
झोप तिला लागली
मग काय ती
झोपेतच खेळली
इकडे तिकडे लोळली
थोड्या वेळाने तिला जाग आली
अन् विचार करत स्वतःशीच
म्हणाली,
"एक आंबा घेऊन जाऊ
साऱ्या मैत्रिणींना तो दाखवू"

मग एक आंबा तिने तोडला
चोचीमध्ये घट्ट धरला
पंख हलवले, वर केली मान
पण तिला उडताच येईना
चिमणीला काही कळेना
असे काय झाले?
ताकद माझी का कमी पडते
तिने नीट बघितले
तर ती होती एका जाळ्यात!
काळे काळे जाळे पाहून
ती घाबरली विचार करून
अंग तिचे थरथरले
डोळे तिचे भिरभिरले
तिने केला चिवचिवाट
चोच आपटली खाटखाट
पण उपयोग काही होईना
शांत तिला बसवेना
आता मात्र चिऊताई घाबरली
हाका साऱ्यांना मारू लागली,
"कुणीतरी वाचवा मला
या
जाळ्यातून
सोडवा मला"
चिऊताईचा आवाज
मैत्रिणींनी ऐकला
साऱ्याजणी चिऊताईकडे
धावल्या
बघतात तर काय चिऊताई
अडकल्या
साऱ्याजणी हसल्या अन्
म्हणाल्या,
"काय चिऊताई कसा वाटला
आंबा?
गोड आहे ना फार!
मग आंबेच खा झाडावर बसून
बसून राहा अंगावर जाळं ओढून
तशी चिऊताई
म्हणाली,
"अगं माझ्या
मैत्रिणींनो
मदत
मला करा
ना...
मी जाळ्यात
अडकडले
आहे.
माझे पंख
दुखून गेले
आहेत.
चोचीने जाळेसुद्धा तुटत नाही.
तुम्ही काहीतरी करा ना...
मला पटकन सोडवा ना...
यापुढे मी तुमचे ऐकेल,
घाई करणार नाही.
विचार करून काम करीन,
सगळ्यांसोबत राहीन.
चिऊताईला आता पश्चाताप झाला
आपण ऐकायला हवे होते
चिऊताईंने सगळ्यांची माफी
मागितली.
मग सगळ्या मैत्रिणींनी मिळून
एकसाथ जाळे उचलले
आणि चिऊताई मोकळी झाली
मग तिने आकाशात भरारी घेतली
सगळ्यांबरोबर लागली उडू,
आकाशाच्या पायऱ्या लागली चढू.
स्वातंत्र्य म्हणजे काय असतं!
मोकळेपणा म्हणजे काय असतो!
आज चिऊताईने तो अनुभवला
इतरांचा सल्ला आपण ऐकला
पाहिजे.
कोणतेही काम करताना
धोक्याचा विचार आधी केला
पाहिजे.
हा नवा विचार चिऊताईला
अनुभवाने शिकायला मिळाला!
चिऊताई म्हणाली,
ऐका माझे ऐका
करू नका घाई
आधी विचार मग काम
हाच आहे मंत्र भारी!



# मेकअप

साधारण वीस वर्षांपूर्वीची मी गोष्ट सांगत आहे. मुंबई सह्याद्रीवर एक कार्यक्रम होता. 'वसुंधरा दिवस'च्या निमित्ताने या कार्यक्रमात बोलण्यासाठी मला निमंत्रित केले गेले होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात काम करणारे व्यक्ती बोलण्यासाठी आलेले होते जसे की 'लोकसंख्या शिक्षण खाते', 'अनुशक्तीमधील शास्त्रज्ञ', 'गणपती उत्सव महामंडळ अध्यक्ष', 'ज्योतिषशास्त्रातील तज्ज्ञ', 'पोलीस खात्यातील उपनिरीक्षक', 'शालेय विद्यार्थी' इत्यादी. प्रत्येकाला बोलायला दोन-अडीच मिनिटे दिली होती. महाविद्यालयाची प्रोफेसर या निमित्ताने मला विद्यार्थ्यांमध्ये मी 'झाडे लावा, झाडे जगवा.' या उपक्रमासाठी आमचे महाविद्यालय नेमकेपणाने काय करते, याविषयी बोलायचे होते.

मी दूरदर्शन केंद्रावर पोहोचले तेव्हा ते मला मेकअप रूममध्ये घेऊन गेले. खरंतर माझ्या विषयासाठी मी सुंदर दिसण्याची खरंच आवश्यकता नव्हती, काहीतरी सुंदर बोलण्याची गरज होती, असे मला वाटले. मी मेकअपसाठी नकार दिला. तेव्हा त्या कार्यक्रमाच्या अधिकाऱ्याने सांगितले की आपला चेहरा जेव्हा कॅमेराच्या खूप जवळ असतो तेव्हा आपला चेहरा कितीही नितळ असला तरी तो तितकासा चांगला दिसत नाही. त्यामुळे चित्रीकरणासाठी थोडासा तरी मेकअप चेहऱ्यावर असणे आवश्यक आहे. त्यांनी माझ्या चेहऱ्यावर व्यवस्थित मेकअप केला. त्यानंतर मी वॉशरूममध्ये गेले आणि माझा चेहरा पाहून घाबरले. मी अतिशय उग्र आणि भयानक दिसत होते, असे मला स्वतःला उगाचच वाटले. पण काही उपाय नव्हता. मी कार्यक्रमाला गेले. दूरदर्शनसाठी हा माझा पहिलाच अनुभव होता. त्यामुळे थोडेसे धास्तावलेले होतेच. चकचकीत दिव्यांच्या समोर असलेल्या आकर्षक खुर्च्यांवर आम्ही सगळे अर्धगोलाकार बसलो. समोर असलेल्या कॅमेऱ्यांपैकी मी नेमक्या कोणत्या कॅमेराकडे पाहत बोलायचे, हे मला समजावून सांगितले गेले. त्यामुळे समोरच्या सहा कॅमेऱ्यांपैकी माझा कोणता हे मी लक्षात ठेवायचा प्रयत्न केला.

काय बोलायचे हे परत परत आठवत राहिले. कारण मला तसे फारसे पाठांतर जमत नाही. कार्यक्रम सुरू झाला आणि मला सूत्रसंचालकाने प्रश्न विचारल्यावर मी व्यवस्थित उत्तर दिले आणि सुटकेचा निश्वास टाकला. तो रेकॉर्डेड कार्यक्रम होता. त्यामुळे त्याचे प्रसारण ज्या दिवशी होते त्या दिवसाची तारीख आणि वेळ माझ्या सर्व परिचितांना इतकेच काय तर छोट्याशा खेडेगावातल्या नातेवाइकांपर्यंत पोहोचवली आणि त्यांना कार्यक्रम आवर्जून पाहायला सांगितले.

कार्यक्रमाच्या दिवशी मी अगदी वेळेच्या आधी टीव्ही चालू करून माझ्या कुटुंबीयांसोबत तो कार्यक्रम पाहण्यासाठी बसले. कार्यक्रम झाल्यावर अपेक्षित होते की खूप जण फोन करतील पण कोणाचाच फोन आला नाही. मग मीच फोन करायला सुरुवात केली. सगळ्यात आधी दूरच्या लोकांना फोन करावा म्हणून वर्धाच्या खेडेगावातील चुलत भावाला फोन केला मग नागपूरच्या मामाला फोन केला आणखी कोणाकोणाला, तर ते सगळे म्हणाले की एवढा आम्ही आठवणीने कार्यक्रम पाहिला पण तू काही आम्हाला दिसलीसच नाही. 'मी कार्यक्रमात आहे', असे ज्यांना माहीत असूनही, त्यांनी मला ओळखले नाही, याचे खूप वाईट वाटले. मग असेही वाटून गेले की इतक्या मोठ्या प्रमाणात लोकं टीव्ही पाहतात, कोणीच मला ओळखले नाही, तर काय उपयोग आहे त्या कार्यक्रमात जाऊन माझा?

...तर अतिमहत्त्वाचा सांगायचा मुद्दा म्हणजे त्यांनी माझ्या चेहऱ्यावर केलेल्या मेकअपमुळे मी इतकी बदलून गेले होते की, कोणी मला नावानिशी ओळखूच शकले नाही. आताही कोणत्याही चॅनलवर कार्यक्रमासाठी गेले की मी विनंती करून सांगते की मला इतका कमी मेकअप करा की लोकांनी मला ओळखले पाहिजे!

'मेकअप' म्हणजे चेहऱ्यावर सौंदर्यप्रसाधने वापरून आपला चेहरा अधिक आकर्षक आणि सुंदर बनवणे, ही मेकअपची व्याख्या आपण सर्व जाणतो. तो चेहरा सुंदर बनवणे ठीक आहे पण तो कमीत कमी ओळखता येईल असा ठेवणेसुद्धा कुठेतरी अपेक्षित आहे असे मला वाटते. अगदी पूर्वापार वर्तमानपत्रातून, मासिकातून, दिवाळी अंकांमधून सौंदर्य वृद्धिंगत कसे करायचे या विषयीच्या टीप असायच्या. त्या वहीत लिहून ठेवलेल्या आहेत. त्यानंतर सौंदर्यविषयक काही कात्रणं कापून चिकटवून ठेवलेल्या वह्यासुद्धा अजूनही जपून ठेवलेल्या आहेत. आता तर काय सोशल मीडिया मेकअप किट आणि मेकअप कसा करायचा या पद्धतीचा जोरदार मारा सुरू असतो आणि या वयातही मी अगदी वेळ देऊन त्याकडे पाहात असते. मी स्वतः मेकअप करत नसले तरीही कोणत्याही मुलीला मेकअप करून तिला सुंदर बनवताना पाहणे, खूप आनंददायी असते.

एका युट्युबमध्ये एका सौंदर्यवतीचा मेकअप उतरवताना दाखवलेले आहे. तो उतरल्यावर तिचा चेहरा पाहून मी दचकले, तर मेकअप नेमके काय करू शकतो हे लक्षातही आले. घामाने किंवा पावसाच्या पाण्याने मेकअप उतरून जाऊ नये यासाठी आजकाल वॉटरप्रूफ मेकअपसुद्धा उपलब्ध आहेत. त्यामुळे सिनेकलाकार शॉवरखाली किंवा पावसात भिजतानाही इतक्याच सुंदर दिसतांना दाखवता येतात. असो.

मेकअप चढवल्यावर आपण आपल्याला ओळखता येऊ नये इतका तो गडद नसावा आणि मेकअप उतरल्यावर आपण आपला आत्मविश्वास गमवावा, इतका तो हलका नसावा! एकंदरीत काय तर चेहरा सुंदर बनवणाऱ्या मेकअपपेक्षा समोरचा माणूस आपल्या स्वभावाने आकर्षित होईल, आपला आदर करेल आणि आपण जे काही बोलू, त्याला तो समजून घेईल असे कोणत्याही मेकअपशिवाय असलेले मन आपल्याला निश्चितपणे प्रगतिपथाकडे घेऊन जाईल! ओळखीच्या किंवा बिनओळखीच्या माणसांसमोर केलेले केवळ एक हलकेसे स्मितसुद्धा कोणत्याही मेकअपपेक्षा जास्त भारी असते शिवाय 'हास्य' हा सुंदर दागिना कायमस्वरूपी आपल्यासोबत असतोच, होय ना?

pratibha.saraph@ gmail.com



प्रतिभारंग
**प्रा. प्रतिभा सराफ**

# यश



यश ही अशी गोष्ट आहे की ती प्रत्येकाला आपल्या जीवनात हवीहवीशी वाटते, पण ती प्रत्येकाच्या वाट्याला येतेच असे मात्र नाही. ती दुर्मीळ आहे असे नाही. पण यश मिळविण्यासाठी खूप परिश्रम करावे लागतात. यश मिळविण्यासाठी रूप सुंदर व देखणं असावे लागते असे नाही. उंच, बुटकी, कुरूप, सडपातळ, रंगाने काळी माणसे देखील जीवनात यशस्वी होतात.

पंडित मदन मोहन मालवीय यांनी स्वतःच्या श्रीमंतीतून नव्हे, तर इतरांकडून मिळविलेल्या देणग्यांतून बनारस हिंदू विद्यापीठाची स्थापना केली. डेमोस्थेनीस हा मुखदुर्बल होता, त्याच्या बोलण्यात अनेक दोष होते पण त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि तो फर्डा वक्ता झाला! यशाची गुरुकिल्ली कोणालाही प्रयत्नाने हस्तगत करता येते.

यशस्वी होण्यासाठी जीवनात काहीना काहीतरी ध्येय असले पाहिजे. जीवनात कोणते तरी निश्चित ध्येय असले की ते प्राप्त करण्यासाठी योग्य मार्गाच्या दिशेने व्यक्तीची वाटचाल होऊ शकते. संत हे तुमच्या आमच्यासारखे सामान्य होते पण त्यांनी ईश्वरप्राप्तीचे ध्येय निश्चित केले आणि जीवनात वाटचाल केली. त्यामुळे ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, परमहंस, विवेकानंद हे संत-पुरुषात गणले गेले. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ते छत्रपती शिवाजी राजे झाले. जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येयाप्रमाणेच विविध स्वप्नही रंगविली पाहिजेत. मानवाने स्वप्न रंगविले की आकाशात दिसणाऱ्या चंद्रावर मी एकदा पाऊल ठेवीन! राईट बंधूंनी पक्ष्यांप्रमाणे आकाशात उडण्याचे स्वप्न रंगविले! पारतंत्र्यात खितपत पडलेल्या लोकांनी शतकानंतरची भारताच्या स्वातंत्र्याची रम्य पहाट पाहण्याचे स्वप्न रंगविलं. कुंडलच्या ओसाड माळावर लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी उद्योग समूह उभारावयाचे स्वप्न रंगविले !

ध्येय निश्चित केले पाहिजे, स्वप्न रंगविली पाहिजेत. जीवनात यशस्वी होण्यासाठी संधीची प्रतीक्षा केली पाहिजे. ती संधी हुकू देता कामा नये. प्रयत्नाचा डोंगर उभा करून यश संपादन केले पाहिजे. यासाठी जे अथक परिश्रम केले जातात ते खरे भांडवल असते! आपण करीत असलेल्या कामावर आपले प्रेम असले की नैपुण्य संपादन करण्यातले खरे सुख कळते! नेतृत्व आणि पुढाकार घेतल्यामुळे यश प्राप्तीचा मार्ग सोपा होतो. कोणतेही काम असो ते उत्कृष्ट करावे लागते. ते उत्कृष्ट केले की सर्व काही साध्य होते. नाही तर यश दूर पळण्याची शक्यता असते.

विद्यार्थी मित्रांनी परीक्षेत यश मिळवण्याचे ध्येय निश्चित केले पाहिजे. चांगल्या गुणांची जोपासना करण्याचा आपण चंग बांधला पाहिजे. एकदा ध्येय ठरवले की त्या दृष्टीने अथक परिश्रम केले पाहिजेत. त्यात येणारे अडथळे दूर केले पाहिजेत. योग्य मार्गावर वाटचाल केली पाहिजे. आपल्या प्रयत्नात सातत्य पाहिजे. एवढं केले की यश हे आपल्यापासून कधीच दूर जाणार नाही.

क्रीडा, कला, साहित्य, राजकारण, समाजकारण अशी अन्य क्षेत्र आहेत की ज्यात माणसांना यश मिळविण्याची संधी आहे. यश मिळविण्याची तीव्र इच्छा मनात असली पाहिजे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मार्सेलिसच्या समुद्रात उडी टाकताना मागं पुढं पाहिलं नाही. तेव्हा त्यांना भारत भूमी स्वतंत्र झालेली पाहावयास मिळाली. यश मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न, धाडस, परिश्रम आपल्याला दिसत नाहीत आपल्याला शेवटी दिसते ते यश!

पंडित भीमसेन जोशी यांनी संगीताच्या क्षेत्रात केलेले परिश्रम आपल्याला दिसत नाहीत. सुनील गावस्कर यांच यश दिसतं पण त्याची एकाग्रता, इच्छा शक्ती आणि त्यांनी घेतलेले कष्ट आपण नजरेआड करतो. अशिक्षित आणि कमी शिकलेल्या व्यक्ती जीवनातील विविध क्षेत्रात अमाप यश मिळविताना दिसतात. यासाठी आपण सर्वांनी "हरलेल्या माणसांच्या गोष्टी'' हे पुस्तक वाचावे. या कथासंग्रहाच्या लेखिका डॉ. छाया महाजन आहेत.

जीवनातल्या कोणत्याही क्षेत्रात आपण दैदीप्यमान यश मिळवू शकतो पण त्यासाठी त्या कार्याला आपण स्वतःला वाहून घेतले पाहिजे. आपल्या ध्येयाचा ध्यास घेऊन प्रयत्नांच्या बळावर इच्छाशक्तीने भारावून जाऊन यशाची ध्वज पताका सर्वोच्च शिखरावर आपण निश्चितपणे रोवू शकतो.



लहानशा गोष्टी, मोठा अर्थ
**शिल्पा अष्टमकर**

# नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये

**शेख निजाम** | **बीड नगर परिषदवर हंडा मोर्चा**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: मागील सहा महिन्यापासून बीड शहरांमध्ये नगरपरिषदेच्या नाकर्तेपणामुळे व नियोजन शून्यते मुळे झालेल्या अभूतपूर्व पाणी टंचाई पुरवठाच्या संदर्भात बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला होता त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शेख निजाम व लोकपत्रकार भागवत तावरे, युवा नेते बळी गवते यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपरिषद प्रशासन विरोधात भव्य हंडा मोर्चाचे आयोजन दिनांक ९ मे २०२५ रोजी करण्यात आले होते सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील सर्वपक्षीय नेते नगरसेवक शेख अमर, मुन्नाभाई इनामदार, सय्यद इलियास, कय्युम इनामदार, आयुब पठाण, सय्यद फहीम, सय्यद आझम शेख हमीद, शहबाज कादरी, सत्तार इनामदार, शेख कदीर, शेख जाकीर, सादिक पठाण, शेख पाशा, जयंत वाघ, यांच्या सहित हजारो सुजाण नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने पान २ वर






**आजपासून पाणीपुरवठा सुरळीत :** पाणी टंचाईचा सामना करणाऱ्या बीड शहर वासियांना नगरपालिकेच्या वतीने जाहीर आवाहन करण्यात आले यामध्ये आज पासून पूर्वत पाणीपुरवठा सुरळीत होणार असल्याचे नगरपालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. पाणी टंचाई व भीषण उन्हामुळे पाण्याचा वापर अधिक प्रमाणात नागरिकांच्या कडून केला जातो यामुळे उन्हाळ्यात पाण्याची गरज असते मात्र माजलगाव पॅक वॉटर चे काम रखडल्याने बीड शहराला तब्बल २५ ते २६ दिवस पाणीपुरवठा होत होता यामुळे शहरातील नागरिकांचे हाल झाले. टँकर माफिया व विकतचे पाणी नागरिकांना घ्यावे लागत होते.

## स्पर्धा परिक्षेत मिळविले यश

### अभिनंदनिय:सुकन्या मुंडेंची RTO पदावर नियुक्ती

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी: तालुक्यातील तळेगाव येथील स्मृतीशेष सुधीर मुंडे यांची कन्या कु. सुकन्या कामिणी सुधीर मुंडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत राजपत्रित वर्ग १ सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठढज (ठळीींरपीं ठशसळेपरश्र ढीरपीीिी षषळलशी) या अत्यंत प्रतिष्ठित पदासाठी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

यावेळी बोलताना कु. सुकन्या कामिणी सुधीर मुंडे यांचे एसएससी पर्यंतचं शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय गढी (बीड) येथे झाले तेव्हा पासूनच प्रशासकीय सेवेत जाऊन समाज सेवा करायची ठरवले होते. UPSC CIVIL services च्या ४ ारळपी परिक्षा दिल्या पन त्यात मुलाखतीसाठी पात्र होऊ शकले नाही. युपीएससीची तयारी करतानाचं सोबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा दिल्या सहा मुख्य परीक्षा आणि दोन मुलाखतीनंतर मला हे यश प्राप्त करता आले.या सगळ्या श्रेय माझी आजी , आजोबा,आई , मामांना जातं माझी एक्झाम फक्त माझी नसायची ती अख्या परिवाराची असायची जेव्हा जेव्हा अपयश आले तितक्या वेळा त्यांनी पुन्हा मेहनत करण्याची ताकद दिली. त्यांच्या सपोर्ट शिवाय हे यश अशक्य होतं. त्यामुळे हे यश माझं आहे त्या पेक्षा कित्येकतरी पटीनं माझ्या फॅमिलीचे यश आहे. हा प्रवास खरंच सोपा नव्हता.पन सातत्य, संयम, कठीण परिश्रम पान २ वर

## परळीत सामूहिक विवाह सोहळा

### धोरण:ग्लोबल विकास ट्रस्टचा उपक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने ११ गरीब कुटुंबातील जोडप्यांचा आगळा वेगळा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या बाजूला असलेल्या हलगे गार्डन येथे आज दिनांक १० मे रोजी दुपारी १२.३० वाजता या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, जवळपास ४ हजार पाहुणेमंडळी या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत. तसेच हा कार्यक्रम संपूर्णतः पर्यावरणपूरक असणार असून कुठेही प्लॅस्टिकचा वापर केला जाणार नाही अशी माहिती ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी यांनी दिली. यासंदर्भात जिव्हिटीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी डॉ. हरिश्चंद्र वगे यांची उपस्थिती होती.

ग्लोबल विकास ट्रस्टचे संचालक मयंक गांधी यांच्या वतीने परळी तालुक्यात मोठी सामाजिक चळवळ उभी करण्यात आली आहे. ट्रस्टच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येतात. याच ट्रस्टच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप खेरुका यांचे कुटुंब, त्यांच्या कन्या अलकनंदा रूईया आणि जावई यांच्या वतीने ११ गरीब जोडप्यांच्या विवाहासाठी १५ लक्ष रुपयांची मदत देण्यात आली आहे. लंडन येथे झालेल्या लग्न सोहळ्याच्या निमित्ताने ही देणगी संबंधित कुटुंबाने दिली आहे. आजमितीस अनेक अशी कुटुंबे आहेत ज्यांना की मुलींच्या लग्नाचा भर झेपत नाही. यातूनच अनेकांच्या आत्महत्या होतांना ग्लोबल विकास ट्रस्टने अनुभवलेले आहे. या समस्यांवर उपाय म्हणून हा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न होत आहे. या विवाह सोहळ्यात हुंडा न देण्याची आणि न घेण्याची शपथ दिली जाणार आहे. ग्लोबल विकास ट्रस्टकडून नवदाम्पत्याला सर्व संसारोपयोगी साहित्य भेट म्हणून दिले जाणार असून, प्रत्येक जोडप्याच्या नावे संयुक्तरीत्या ७० हजार रुपयांच्या मुदत ठेव (षळ वर्शीीळीं) प्रमाणपत्र त्यांना दिले जाणार आहे. या आगळ्यावेगळ्या सामुदायिक विवाह सोहळ्यास सुमारे चार हजार पाहुणेमंडळी उपस्थित राहणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे. पान २ वर

## रेतीची अवैधरित्या चोरटी वाहतुक

### दणका:वाहनाविरुध्द माजलगांव शहर पोलीसांची कारवाई

पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:येथील शहर पोलीसांनी गोपनिय माहीतीच्या आधारे शहरातील समता कॉलनी येथील आनंद बालरुग्नालय समोर समोर दि ०९ मे शुक्रवार रोजी ०२:०० वाजण्याच्या दरम्यान एक अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक करत असलेला पासिंग क्रमांक नसलेला ४०७ टेम्पो रेतीसह पकडुन टेम्पो किंमती ,दोन लाख रुपये व दोन ब्रास रेतीची किंमत १०,०००/ रुपये असा एकुण दोन लाख दहा हाजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, पान २ वर

## खरीप हंगामाचे नियोजन योग्य करावे!

### आ.प्रकाश सोळंके:माजलगाव पंचायत समितीत बैठक

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव: येथील पंचायत समिती कार्यालयात माजलगाव,वडवणी व धारूर तालुक्यातील खरीप पूर्व हंगाम आढावा बैठक दि ०९ मे शुक्रवार रोजी घेण्यात आली.खरीप हंगामाचे नियोजन करताना शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवावे ही महत्वपूर्ण सूचना आ.प्रकाश सोळंके यांनी खरीप हंगाम आढावा बैठकीत करण्यात आली.

खरीप हंगाम २०२५ च्या अनुषंगाने प्रशासनाकडून तीस कलमी कार्यक्रम राबवण्यात येणार असून यामध्ये खरीप हंगाम सभेचे नियोजन,माती परीक्षण मोहीम व जमीन आरोग्य पत्रिका वाटप,बीज प्रक्रिया मोहीम,घरगुती चाचणी पद्धतीने बियाणे उगवण क्षमता तपासणी प्रात्यक्षिक मोहीम,क्रॉपसॅप व हॉर्टसँपसाठी शेतकरी निवड व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण,शेतीशाळा नियोजन,प्रमुख खरीप पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गांवनिहाय प्रशिक्षण मोहीम,जमीन सुपीकता निर्देशकांच्या आधारे खतांचा वापर,आपत्कालीन पिक नियोजन,महाडीबीटी प्रणालीवर अर्ज वाढविणे कृषि निविष्ठाच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम,पुरस्कारासाठी शेतकरी निवड,बीबीएफ / मुलस्थानी जलसंधारण/ पट्टापेर पद्धत,हिरवळींच्या खतांचा निर्मिती व वापर,बायोचार निर्मिती बाबत शेतकऱ्याना अवगत करणे,फळबाग लागवडीसाठी सीआरए तंत्राचा वापर,यशोगाथा संकलन मोहीम,कृषी विषयक माहिती व तंत्रज्ञानांची साधने याबाबत माहिती देणे अशी विविध तीस कलमांचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन खरीप हंगामाचे नियोजन करण्यात येणार आहे.खत आणि बियाणे पुरवठा संबंधी योग्य नियोजन करावे.याबाबतीत शेतकऱ्यांची हेळसांड होणार नाही याची दक्षता पान २ वर

## धम्मरॅलीत सहभागी व्हावे

### डॉ भागवत साळवे:माजलगाव येथे बौद्ध जयंती

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:भारतीय बौद्ध महासभा तालुका याजलगावच्या वतीन तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९व्या जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात येत आहे त्या अनुशंगाने दि १ मे २०२५ ते ५ मे २०२५ या कालावधीत त्रिसरण बुद्ध विहार चिंचगव्हाण येथे महिला उपासिका शिबीर संपन्न झाले,४ मे २०२५रोजी बुद्ध विहार संम्राट अशोक नगर येते अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर संपन्न झाले आणी दि ३ मे२०२५ पासुन पुज्य भन्ते दिपरत्न यांच्या नेतृत्वात सांची बुद्ध विहार, डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते १० दिवशीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबीर चालु आहे त्या शिबीराचा समारोप दि १२मे २०२५ वार सोमवार वैशाख पौर्णिमा या दिवशी सकाळी ८.वा डॉ आंबेडकर चौक ते सांची बुद्ध विहार आसी भव्य रॅली चे आयोजन करण्यात आले आहे तसे ठिक १०वा पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे जिल्हा अध्यक्ष आद.बी बी धन्वे सर यांच्या हस्ते होईल तसेच संघ भोजन होऊं पुज्य भन्ते दिपरत्न यांची धम्मदेशना होऊन शिबीराचा समारोप होईल या भव्य धमरॅलीस धम्म धम्म उपासक उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्तीत पान २ वर

## ठाकरे भवनाला जागा उपलब्ध

### पापा सोळंके: उपमुख्यमंत्री यांनी दिला हिरवा कंदील

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:सविस्तर वृत्त असे की दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांना माजलगाव येथील नगरपरिषद अंतर्गत हिंदूहृदय सम्राट माननीय श्री बाळासाहेब ठाकरे सामाजिक भवन उभारण्यासाठी शिवसेना माजलगाव शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी मुंबई येथे भेटून निवेदन दिले होते. मा उपमुख्यमंत्री एकनाथी शिंदे साहेब यांनी तातडीने माजलगाव नगरपरिषद मुख्याधिकारी यांना अ प्रमाणे कार्यवाही करावी असे आदेशित केले, मा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पत्र क्र ऊ मू का इ_७८३८९६२/२५ दि ७/२/२०२५ च्या अनुषंगाने माजलगाव शहरातील सर्वे नंबर ३७१ मधील खुली जागा स्वर्गीय हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे सामाजिक भवन तसेच सुशोभीकरण वृक्ष लागवड कुंपण घालने तसेच सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध करून द्यावी असे आदेशित केले.

माजलगाव चे मुख्याधिकारी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या पत्रानुसार रीतसर प्रशासकीय ठराव घेऊन माजलगाव शहरातील सर्वे नंबर ३७१ मधील ३२५.५० स्क्वेअर मीटर एवढी जागा स्वर्गीय हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे सामाजिक भवन उपलब्ध करून दिली.या हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे भवन ला जागा उपलब्ध व्हावी यासाठी विशेष प्रयत्न शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष माननीय सईद खान, युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी केले. वरील मान्यवरांचे आभार शिवसेना शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी व्यक्त केले.

## सुभाष बेदमुथा यांचे संथारा व्रतात निधन

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:येथील प्रसिद्ध किराणा व्यापारी सुभाषचंद चंदूलालजी बेदमुथ्था यांचे आज (दि.९) रोजी पहाटे २.३० च्या सुमारास अल्पशा आजाराने संथारा व्रतात निधन झाले. मागिल काही महिन्यांपासून ते फुफसाच्या आजाराने त्रस्त होते. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते.

धार्मिक वृत्तीचे, मनमिळाऊ स्वभावामुळे सुभाष बेदमुथ्था हे समाजात सुपरिचित होते. धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात ते सतत पुढाकाराने सहभाग घेत असत. परंतू मागील काही दिवसांपासून ते फुफुसाच्या आजाराने त्रस्त होते. त्यांच्यावर पुणे येथील खाजगी रूग्णालयात व नंतर छ.संभाजी नगर येथील खाजगी उपचार सुरू होते. अखेर डॉक्टरांनी हात टेकल्यानंतर त्यांनी जैन धर्मातील सर्वात मोठे समजले जाणारे संथारा व्रत घेतले. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर सायंकाळी ४ च्या सुमारास मोंढा भागातील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार पान २ वर

**भरत गीते** | **तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनीच्या कार्यक्रमास शरदचंद्र पवार उपस्थित**

# आम्हा सर्वांसाठी ऊर्जा अन् प्रेरणेचा स्त्रोत

पुण्यभूमी प्रतिनिधी



पुणे:तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनीचे एमडी तथा सीईओ आणि उद्योग जगतात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या ल्युमिनियम मॅन भरत गिते भरत गीते यांचा संघर्ष आणि प्रकल्प तरुणांसाठी प्रेरणादायी आहे चाकण औद्योगिक वसाहतीमधील तौरल इंडिया प्रा. लि. या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन प्रकल्पास खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी तौरल इंडिया प्रायव्हेट. लि. कंपनी येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी श्री गित्ते यांनी त्यांचे स्वागत केले. दरम्यान भरत गित्ते यांनी तौरल इंडिया प्रायव्हेट. लि. या कंपनीच्या माध्यमातून नावलौकिक प्राप्त केले आहे. ल्युमिनियम मॅन भरत गिते यांनी औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करुन कामगिरी केली आहे. येणाऱ्या काळात उद्योजक भरत गिते यांचे औद्योगिक क्षेत्रातील कार्य नवीन उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे प्रतिपादन खा. शरदचंद्रजी पवार यांनी केले आहे. खा. शरदचंद्रजी पवार साहेबांची उपस्थिती ही आम्हां सर्वांसाठी ऊर्जा व प्रेरणेचा स्त्रोत असल्याचे प्रतिपादन उद्योजक भरत गिते यांनी केले आहे.

तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनीचे एमडी तथा सीईओ आणि उद्योग जगतात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या ल्युमिनियम मॅन भरत गिते यांच्या तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनी येथे देशाचे ज्येष्ठ नेते खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांचे बीड व परळीचे भूमिपुत्र पान २ वर

साहेब, आपण स्वतः येथे आलात, त्याबद्दल मन:पूर्वक आभार. आजचा दिवस हे तौरल इंडियाच्या इतिहासातील उत्सवाचं क्षण आहे. आपल्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रातील प्रत्येक टप्प्यावर सकारात्मक बदल घडले. आज आपण आलात यामुळे आम्हा सर्वांना नवचैतन्य, ऊर्जा व प्रेरणा मिळाली.
–भरत गीते, संस्थापक, तौरल इंडिया प्रा. लि.

मराठवाड्यासारख्या संघर्षमय भूमीतून आलेले भरत गिते यांनी जर्मनीत ज्ञान मिळवून शून्यातून उभारलेला हा प्रकल्प आजच्या तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरेल.
– शरदचंद्रजी पवार

## राहुरीत खिस्ती भजन स्पर्धा

### आवाहन:फा जेरोम,फा रमेश त्रिभुवन यांचे स्मरण





पुण्यभुमी प्रतिनिधी

राहुरी: येथील सेन्ह सदन चर्च येथे स्व फा जेरोम व रमेश त्रिभुवन यांच्या स्मरणार्थ भव्य राज्यस्तरीय खिस्ती भजन स्पर्धेचे आयोजन शनिवार १०/५/२५रोजी आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक २१०००रु द्वितीय पारितोषिक १५००० रु तृतीय ११०००रु बक्षीस वितरण करण्यात येणार असुन उत्कृष्ट गायक ३०००रु तर उत्कृष्ट तबलावादक ३०००रु चे रोख पारितोषिक पान २ वर